**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**अर्धा-तास चर्चा**

**पृ.शी.** : वनस्पतीच्या लागवडीतून बायोडिझेल निर्माण करण्याच्या शासनाच्या विचाराधीन असलेला प्रस्ताव

**मु.शी.**: वनस्पतीच्या लागवडीतून बायोडिझेल निर्माण करण्याच्या शासनाच्या विचाराधीन असलेला प्रस्ताव या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 13209 ला दिनांक 21 मार्च 2006 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात डॉ.निलम गोऱ्हे, वि.प.स यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, "वनस्पतीच्या लागवडीतून बायोडिझेल निर्माण करण्याच्या शासनाच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावाबाबत." या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १३२०९ ला दिनांक २१ मार्च, २००६ रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम ९२ अन्वये ही अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. विनोद तावडे)**

सभापती महोदय, शासनाच्यावतीने या संदर्भात अनेक घोषणा केल्या आहेत. अतिशय औचित्यपूर्ण असलेली ही चर्चा या राष्ट्राचे राष्ट्रपती माननीय डॉ. अब्दुल कलाम हे काल मुंबईमध्ये असतांना या सभागृहामध्ये उपेक्षित होणे अपेक्षित होते. राष्ट्रीय पातळीवर जेट्रोफाची लागवड करण्याबाबत विविध जिल्हयात विविध उद्दिष्ट ठरवून देण्यात आले होते. त्यानुसार महाराष्ट्र सरकारने 26 एप्रिल 2006 रोजी रोजगार हमी योजनेंतर्गत जेट्रोफाच्या लागवडीसंबंधी एक जी.आर. काढला. या चर्चेच्या माध्यमातून काही प्रश्नासंबंधी शासनाचे धोरण स्पष्ट झाले पाहिजे अशी माझी मागणी आहे. पहिला प्रश्न असा की, हजारो एकर असलेली वनेतर पडीक जमीन आहे त्याठिकाणी जेट्रोफाची लागवड करण्यासाठी शासन प्रोत्साहन देणार आहे काय? त्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे हे स्पष्ट झाले पाहिजे. दुसरा प्रश्न असा की, जेट्रोफाच्या लागवडीसाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोणत्या स्वरुपामध्ये आर्थिक तरतूद कृषि संचालकांनी केली आहे? आणि त्यानुसार गेल्या तीन महिन्यात कोणत्या स्वरुपाची कारवाई झाली आहे? आणि तिसरा प्रश्न असा की,

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

जेट्रोफाच्या लागवडीसाठी ज्या ज्या जिल्हयामध्ये जे जे उद्दिष्ट ठरवून दिले होते त्यामध्ये आदिवासींना देखील योग्य ते प्राधान्य मिळाले पाहिजे. जे भूमिहीन आहेत त्यांना कोणत्याही स्वरुपामध्ये आर्थिकदृष्टया संरक्षण मिळत नाही. म्हणून चंद्रपूर, गडचिरोली जिल्हयामध्ये जे उद्दिष्ट ठरवून दिले होते ते जास्त होते. बाकीच्या जिल्हयामध्ये 100 हेक्टरचा लक्ष्यांक दिला होता. म्हणून मला याठिकाणी सांगावेसे वाटत की, मोठया प्रमाणात वैयक्तिक स्वरुपामध्ये किंवा संघटीत स्वरुपामध्ये लोकांनी किंवा भूमिहीन लोकांनी मागणी केली तर त्यांच्याकरिता आपण हा कार्यक्रम हाती घेणार काय? त्या कार्यक्रमानुसार जेट्रोफाच्या लागवडीसाठी त्या त्या जिल्हयांना उद्दिष्ट वाढवून दिले जाईल कां? या संदर्भात उपस्थित करीत असलेल्या अर्धा तास चर्चेला माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना ठोस स्वरुपाचे धोरण ठरवून त्या धोरणाची अंमलबजावणी भविष्यामध्ये कशापध्दतीने करुन ही उद्दिष्टपूर्ती करणार आहात हे स्पष्ट करावे. तेव्हा त्यासंबधीची उपाययोजना मंत्रीमहोदय उत्तरात स्पष्ट करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपविते.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, याठिकाणी बायोडिझ ेलच्या निर्मितीकरिता वनस्पतीची लागवड करण्याचे शासनाने धोरण ठरविले आहे. कोकणामध्ये विशेषत: रायगड जिल्हयामध्ये जी वनेतर पडिक जमीन आहे त्याठिकाणी जेट्रोफाची लागवड करण्यासाठी शासनाने प्रोत्साहन दिले पाहिजे. त्या जमिनीवर वन विभागामार्फत लागवड करण्यासाठी शासनाने आग्रह धरावा. त्याठिकाणी पडून असलेल्या वनेतर जमिनीवर आंबा किंवा काजूची लागवड करण्यासाठी शासनाचा वन विभाग परवानगी देत नाही. तेव्हा खास बाब म्हणून आपण पडून असलेल्या वनेतर जमिनीवर या वनस्पतीची लागवड करावी.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (पुढे सुरु...

त्या दृष्टीने शेतकऱ्यांना मोठे उत्पन्न मिळू शकते. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने प्रस्ताव आणलेला आहे, त्या प्रस्तावाच्या निमित्ताने सूचवू इच्छितो की, रत्नागिरी, सिंधूदूर्ग येथे फॉरेस्टचा प्रश्न आहे. तसेच रायगड आणि ठाणे जिल्ह्यामध्येही फॉरेस्टचा प्रश्न आहे. परंतु त्या ठिकाणी वनेतर जमीन जवळपास 5 ते 7 हजार हेक्टर आहे त्या ठिकाणी या पवनस्पतीची लागवड केली तर त्यामधून शेतकऱ्यांना उत्पन्न मिळू शकते. या वनस्पतीची लागवड करण्याच्या दृष्टीने गंभीरपणाने विचार करावा अशी विनंती करतो.

--

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अतिशय महत्वाचा आणि कोकणाच्यादृष्टीने संपूर्णपणे अर्थकारण बदलणारा अशाप्रकारचा विषय मांडलेला आहे. पडीक जमिनीवर जट्रोफा या वनस्पतीची लागवड करण्याकरिता म्हणून शासन स्वत: होऊन काही उपाययोजना करणार आहे काय ? हा खरा प्रश्न आहे. कोकणामध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत फळलागवड फार चांगल्या पध्दीने झालेली आहे. फळलागवड करण्याकरिता म्हणून काही अटी घातलेल्या आहेत. त्यामध्ये अमुक इतकी एकर जमीन असली पाहिजे, अशाप्रकारची अट आहे. कोकणामधील शेतकरी हे एकरी जमीनीचे मालक नाहीत तर ते गुंठेवारी जमिनीचे मालक आहेत. सन्माननीय मंत्रीमहोदयांना त्यांच्या विभागामध्ये "सावकार" म्हणून आपल्याला संबोधले जाते,आपल्याकडे भरपूर जमीन आहे. शेतकऱ्यांकडेही भरपूर जमीन आहे. जट्रोफा या वनस्पतीच्या लागवडीसाठी फार पाण्याची आवश्यकता नाही, त्याच्या संरक्षणासाठी कुंपण घालण्याची आवयकता नाही, गुराढोरे ती वनस्पती खात नसल्यामुळे त्यांच्यापासूनही धोका नाही. तिसरे म्हणजे रान पक्षांपासून या वनस्पतीला अजिबात धोका नाही, कारण तेही ती वनस्पती खात नाहीत. म्हणून शासनाला विनंती आहे की, रत्नागिरी जिल्ह्यामधील 8 लाख 22 हजार 414 हेक्टर जमिनीपैकी 2 लाख 76 हजार 53 हेक्टर जमीन आज पडीक आहे, मोकळी आहे, सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये 5 लाख 48 हेक्टर जमिनीपैकी आजही 38 हजार 264 हेक्टर जमीन मोकळी आहे, रायगड जिल्ह्यामध्ये जवळजवळ 7148 चौरस कि.मीटर जमिनीपैकी 5,976 चौरस किलो मिटर जमीन मोकळी आहे. मी प्रांतिक बोलत नाही. परंतु कोकणामध्ये शासनाने विशेष पुढाकार घेऊन काही गोष्टी करणे आवश्यक आहे. कोकणामध्ये नैसर्गिक परिस्थती चांगली आहे. पूर्वी या वनस्पतीला 'गोडा एरंड' म्हणून संबोधले जात होते. या वनस्पतीला निसर्गाने पूर्णपणाने साथ दिलेली आहे. जून महिन्यामध्ये लागवड केल्यानंतर त्याला फळे धरतात, हा पिरिअड धोकादायक ठरेल किंवा काय, हे पहाणे आवश्यक आहे. बाकी काही नाही. जट्रोफा या वनस्पतीची लागवड केली तर कोकणातील अर्थकारण बदलू शकते. त्यापासून शेतकऱ्यांना पैसे मिळू शकतात. एकदा त्या वनस्पतींची लागवड केली तर सहाव्या वर्षी त्यांचे उत्पन्न मिळते आणि ते पुढे 35 वर्षापर्यन्त चालू रहाते. यासाठी कायमस्वरुपी बाजारपेठ मिळण्याची आवश्यकता आहे. पेट्रोल, डिझेलचे भाव लक्षात घेता, देशाची इकॉनॉमी देखील बदलण्याची क्षमता या वनस्पतीमध्ये आहे. यासाठी सगळयात



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.भास्कर जाधव (पुढे सुरु....

जास्त पोषक वातावरण हे कोकणामध्ये आहे. किमान या अधिवेशनामध्ये हा विषय गांभीर्याने घेऊन सरकारने स्वत: होऊन पुढाकार घेतला पाहिजे. एका हेक्टरला साडे बारा हजार रुपये खर्च येतो. त्यामुळे हा खर्चही परवडणारा आहे. कार्बन क्रेडिट योजना जागतिक पातळीवर विचारात घेतली जाते.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ...

आज जगामध्ये जे प्रदुषण करणारे कारखाने आहेत त्यांच्यावर बंधने आली आहेत. पर्यावरणाचा समतोल राखला पाहिजे यासाठी तुम्ही मोठ्या प्रमाणवर झाडांची लागवड केली पाहिजे असे बंधन जागतिक पातळीवर आलेले आहे आणि तसा निर्णय झालेला आहे. जगातील अद्ययावत देशांची अडचण अशी आहे की, आज त्यांच्याकडे पैसे आहेत, पर्यावरणाबद्दल आणि प्रदुषणाबद्दल ते आपल्यापेक्षा जास्त जागरुक आहेत परंतु त्यांच्याकडे जमीन नाही. त्यांनी झाडांची लागवड कोठे करावयाची ? ते आपल्या देशामध्ये सुध्दा झाडांची लागवड करण्यास तयार आहेत. त्या लागवडीचा खर्च करण्यास ते तयार आहेत. उत्पन्न तुम्ही घ्या पण फक्त आम्हाला त्याचे क्रेडीट द्यावे असे ते म्हणतात. यासंदर्भात कार्बन क्रेडीट योजना आहे. जपानमध्ये सुध्दा जागा नाही. या गोष्टीचा फायदा आपल्या देशाला मिळू शकतो. लागवड त्यांनी करावयाची, खर्च त्यांनी करावयाचा, उत्पन्न आम्ही घ्यावयाचे पण फक्त लागवड केल्याचे क्रेडीट त्यांना पाहिजे. याचा फायदा आपण घेणार की नाही ? कोकणचे अर्थकारण बदलण्याच्या दृष्टीने यासंदर्भात शासन पुढाकार घेणार की नाही ? कोकणामध्ये एकरावारी जमीन असलेले जमीनमालक नाहीत. एखाद्या शेतकऱ्याची एक गुंठा जमीन असली तरी सुध्दा कायदा शिथिल करुन ही लागवड करण्याकरिता योजना करण्याच्या दृष्टीने शासन कायद्यामध्ये बदल करणार काय ? तशा प्रकारचा बदल शासनाने करावा अशी मी विनंती करतो. यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांना विस्तृतपणे चर्चा करावयाची असेल तर विस्तृतपणे सुध्दा चर्चा करता येईल. यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांना स्थानिक माहिती पाहिजे असेल तर ती आम्ही देऊ. परंतु शासनाने हा निर्णय या ठिकाणी घोषित करावा की, आम्ही कोकणामध्ये ही लागवड रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर करणार आहोत. आम्हाला यासाठी स्वतंत्र पॅकेज नको परंतु रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत याचा अंतर्भाव करुन या योजनेमध्ये गुंठाभर जागा असली तरी आम्ही शेतकऱ्यांना याबाबत परवानगी देत आहोत अशी घोषणा माननीय मंत्रिमहोदयांनी करावी. आज बँका सुध्दा कोणत्याही प्रकारचा जामीन न घेता या लागवडीकरिता स्वतःहून पैसे देत आहेत. परंतु शासनाने आपल्या अधिकाऱ्यांना यासंदर्भात पुढाकार घेण्यास सांगितले पाहिजे. शेतकऱ्यांकरिता ज्या छोट्या छोटया अटी आहेत त्या शिथिल करण्यास सांगावे. यामध्ये शासनाने

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

हेक्टरी साडेबारा हजार रुपये अशी खर्चाची मर्यादा ठेवलेली आहे. एवढ्या खर्चामध्ये ही लागवड होत नाही. कोकणामध्ये खडकाळ जमीन आहे. त्या ठिकाणी जमीन साफ करावी लागते. त्या ठिकाणी झाडेझुडपे भयंकर आहेत. त्यादृष्टीने शासनाने ही खर्चाची मर्यादा वाढवून द्यावी. रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत ही लागवड करण्याचा निर्णय शासनाने घोषित करावा आणि तो निर्णय आज या ठिकाणी घोषित करावा अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

प्रा. शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अत्यंत महत्वाच्या प्रश्नाला या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून वाचा फोडलेली आहे. जट्रोफा लागवड हा महाराष्ट्रात आणि देशात महत्वाचा चर्चेचा विषय बनलेला आहे. छत्तीसगड सारख्या राज्याने जट्रोफा लागवडीसाठी प्रचंड मोहीम हाती घेऊन लक्षावधी एकर जमीन जट्रोफाच्या लागवडीखाली आणलेली आहे. तीन वर्षापूर्वी आपल्या देशाचे माननीय राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम साहेबांनी या महत्वाच्या विषयाकडे राष्ट्राचे लक्ष वेधले. या देशाला इंधनामध्ये स्वयंपूर्ण करण्याची कुवत या जट्रोफामध्ये आहे असे माननीय राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनी सांगितले. त्यानंतर जट्रोफासंबंधी मोठ्या प्रमाणामध्ये चर्चा सुरु झाली. दिवसेंदिवस खनिज तेल दुर्मिळ आणि महाग होत आहे. त्यामुळे खनिज तेलाला पर्याय शोधण्याच्या दृष्टीने इथेनॉल सारख्या तेलाची निर्मिती सहकारी क्षेत्रामध्ये आणि खाजगी क्षेत्रामध्ये अलीकडच्या काळामध्ये होऊ लागली होती. परंतु केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीच्या बाबतीत योग्य प्रतिसाद न दिल्यामुळे इथेनॉल निर्माण करणारे उत्पादक अडचणीत आले. जट्रोफाबाबत बोलावयाचे झाले तर त्यासंबंधी अनेक गैरसमज आहेत आणि त्या गैरसमजाचा फायदा घेऊन काही धंदेवाल्यांनी प्रचंड प्रमाणात पैसे मिळविले आणि ते पळून गेले. जट्रोफा या वनस्पतीची लागवड कोणत्याही पडीक जमिनीमध्ये होते आणि त्याचे उत्पन्न 30-40 वर्षे मिळू शकते अशा प्रकारचा एक प्रचार केला जातो. ग्रामीण भागामध्ये नजर टाकली तर जट्रोफा ही वनस्पती नैसर्गिकरित्या ओढ्याच्याजवळ किंवा पाणथळ जागी उगवते.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 10:45

(प्रा. शरद पाटील....)

त्या ठिकाणी ती तग धरुन राहाते आणि पाणी मिळाले तर त्या झाडापासून भरपूर उत्पन्न मिळू शकते. परंतु पडीक आणि गायरान जमिनीवर ज्या ठिकाणी काही उगवत नाही त्याठिकाणी जट्रोफाची लागवड करावी असा जो प्रचार केला जात आहे तो दिशाभूल करणारा आहे, खोटा आहे. पाण्याअभावी हे जट्रोफाचे झाड जमिनीमध्ये उगवू शकत नाही या गोष्टीकडे शासनाने लक्ष द्यावे आणि त्यादृष्टीने शेतक-यांना योग्य प्रकारचे मार्गदर्शन करावे, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. माननीय मंत्री महोदयांकडे अपारंपरिक उर्जा खाते आहे. त्यामुळे त्यांनी अपारंपरिक उर्जा स्त्रोताचा फार मोठा अभ्यास केलेला आहे. ते निरनिराळया प्रकारे प्रयोग करीत आहेत. या प्रयोगाच्या माध्यमातून आपल्या राज्याला ऊर्जामध्ये स्वयंपूर्ण करण्याचे त्यांचे प्रयत्न स्तुत्य आहेत. जट्रोफाच्या संदर्भात रस घेऊन त्याबाबतीत एक योजना जाहीर केलेली आहे त्याकडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. 1994 साली महाराष्ट्र शासनाने राज्यात फळबाग योजना लागू केली आणि ख-या अर्थाने एक प्रकारची क्रांती झाली आणि शेतक-यांनी प्रचंड प्रमाणावर या फळबाग योजनेला प्रतिसाद देऊन राज्यामध्ये निरनिराळया प्रकारच्या फळांची नर्मिती केली. फळबाग लागवडीच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशातील एक अग्रगण्य राज्य बनलेले आहे. जट्रोफाच्या बाबतीत राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. जट्रोफाच्या एका झाडामागे शासनाने 16 रु. अनुदान जाहीर केलेले आहे. एका एकरामध्ये एक हजार झाडे लावली तर शेतक-यांना 16 हजार रु.चे अनुदान मिळेल. तालिका सभापती महोदय, मी गेली दोन वर्षे जट्रोफाच्या बाबतीत प्रयोग करीत आहे. माझा अनुभव असा आहे की, ही जट्रोफाची लागवड कोणत्याही शेतक-याला परवडणारी नाही. या जट्रोफाच्या लागवडी पासून तीन-चार वर्षानंतर उत्पन्न मिळते आणि त्या उत्पन्नाचा एकंदरीत विचार केला तर ही लागवड शेतक-याला परवडणारी नाही. सन्माननीय सदस्यांनी जट्रोफाची लागवड करणे शेतक-याला परवडेल असे सांगितले. परंतु जट्रोफाची सलग लागवड शेतक-याला परवडणरी नाही. त्यामुळे या योजनेमध्ये बदल करुन शेतक-याने जर शेतीच्या बांधावर लागवड केली किंवा शेताच्या कडेला असलेल्या पडीक जमिनीवर लागवड केली तर त्या बाबतीत त्याला अनुदान मिळावयास पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी सांगितले की, कोकणातील अल्पभूधारक शेतक-यांना या योजनेचा लाभ मिळाला पाहिजे. ज्या शेतक-यांकडे पाणी आहे अशा शेतक-यांना बांधाच्या कडेला या जट्रोफाची लागवड करण्यास प्रोत्साहन दिले

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. शरद पाटील...

पाहिजे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्याच्या कडेला जट्रोफाची लागवड आणि देखभाल करण्यासाठी शेतक-यांना प्रोत्साहन दिले गेले तर या जट्रोफाचे मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळू शकेल. शासनाने जी योजना जाहीर केलेली आहे त्या योजनेअंतर्गत शासनाला एकरी 16 हजार रु. अनुदान द्यावे लागणार आहे. मी या निमित्ताने शासनाला एवढेच सांगू इच्छितो की, जेथे पाण्याची उपलब्धता आहे त्याच ठिकाणी या जट्रोफाची लागवड होऊ शकेल.

डॉ. नीलम गो-हे : जट्रोफाचा रोजगार हमी योजनेमध्ये अंतर्भाव करावा एवढया पुरतीच ही अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे.

प्रा. शरद पाटील : या चर्चेच्या निमित्ताने मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष एका गोष्टी कडे वेधू इच्छित आहे की, मी या जट्रोफाच्या बाबतीत स्वत: प्रयोग करीत आहे. बियाणे लावण्या ऐवजी जट्रोफाची कटींग लावली तर त्यापासून चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळू शकेल. तेव्हा शासनाने जाहीर केलेल्या योजनेमध्ये सुधारणा करावी अशा प्रकारची मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

--

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 10:50

श्री.विनय कोरे (अपारंपारिक ऊर्जामंत्री) : सभापती महोदय, आपल्या देशाच्या आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थकारणावर परिणाम करणाऱ्या एका महत्वाच्या विषयाची चर्चा या सभागृहाच्या सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी उपस्थित केली आहे. या चर्चेच्या निमित्ताने काही महत्वाचे प्रश्न याठिकाणी उपस्थित झालेले आहेत. मी सभागृहाला या निमित्ताने एवढेच सांगू इच्छितो की, जट्रोफा आणि बायोफ्युएल तयार करणाऱ्या वेगवेगळया प्रकारच्या वनस्पतींना चालना देण्याचे धोरण महाराष्ट्र सरकारने या देशात सगळयात अगोदर स्वीकारले आणि राज्य सरकारचे अपारंपारिक ऊर्जेचे धोरण जाहीर करीत असताना या जट्रोफा आणि बायोफ्युएलच्या अनुषंगाने करंज, एरंड यासारख्या वनस्पतींना एका वेगळया स्वरुपात पुन्हा महाराष्ट्रासमोर आणण्याचा प्रयत्न या मंत्रीमंडळाने केला. मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, पड जमिनींच्या अनुषंगाने आदरणीय सदस्यांनी आपल्या भावना याठिकाणी व्यक्त केल्या. आपल्या राज्यात जवळजवळ 8.5 लाख हेक्टर पड जमीन उपलब्ध आहे. जवळजवळ 13.5 लाख हेक्टर कायम गुरे चरणारी जमीन उपलब्ध आहे. अशा जवळजवळ 22 लाख हेक्टर जमिनीपैकी सुरुवातीला किमान 3 लाख हेक्टर जमिनीवर अशा प्रकारचा प्रयोग आपल्याला करता येईल का याच्या अनुषंगाने महाराष्ट्र सरकारने एक धोरण निश्चित केले आहे आणि पहिल्या वर्षी म्हणजे सध्या सुरु असलेल्या आर्थिक वर्षात प्रत्येक महसुली विभागात 10 हजार हेक्टर क्षेत्रावर पहिला प्रयोग करायचे आपण निश्चित केले आहे. या पड जमिनींचे वाटप कसे करायचे? पड जमिनींचा विकास करीत असताना अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या, बेरोजगार युवकांच्या सोसायटऱ्यांना जमीन देता येईल का? यातील 40 टक्के जमीन काही उद्योजक बायोफ्युएल तयार करणाऱ्या वनस्पतींची लागवड करुन विकसित करणार असतील तर त्यांना देता येईल का? याचे एक धोरण तयार करण्याचे काम महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती करीत आहे. महाराष्ट्रातील सगळ्या जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्हयातील पड जमिनींची माहिती तातडीने शासनाला उपलब्ध करुन द्यावी अशा सूचना दिलेल्या आहेत. जालना, उस्मानाबाद आणि सातारा या जिल्हयांची माहिती शासनाकडे उपलब्ध झालेली आहे. पड जमिनींचा यासाठी वापर करुन प्रत्यक्षात त्याचा प्रयोग आणि कृती सुरु होणारे काम नजिकच्या काळात अपारंपारिक ऊर्जा मंत्रालय करणार आहे. या सगळया विषयासाठी आर्थिक तरतूद आहे का याच्या अनुषंगाने काही भावना याठिकाणी व्यक्त केल्या गेल्या. मला सांगितले पाहिजे की, शेतकऱ्यांच्या ज्या पड जमिनी आहेत, ज्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे.........

ठिकाणी इरिगेशन नसल्यामुळे, अत्यल्प पाऊस पडत असल्यामुळे अशा जमिनींमध्ये काहीही पीक घेता येत नाही अशा जमिनींवर या वनस्पतींसाठी राज्य सरकारकडून 100 टक्के अनुदानातून लागवडीला परवानगी देण्याचा धाडसी निर्णय देशात पहिल्यांदा महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. आदरणीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे प्रती रोप रुपये 16 ऐवजी रु.18.40 इतके अनुदान देण्याचे धोरण राज्य सरकारने स्वीकारले आहे. बांधावरील लागवडीला परवानगी देता येईल का? कोकणातील कमीत कमी गुंठे जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना याचा लाभ देता येईल का? याबाबत भावना व्यक्त केल्या गेल्या. त्याबद्दल एवढेच म्हणेन की, याठिकाणी कमीत कमी 100 झ ाडांची आणि हेक्टरी 2200 झाडे लावता येतील.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे....

त्यामुळे ज्याची एक गुंठा, दोन गुंठा जमीन आहे त्यांना सुध्दा या पासून लाभ मिळू शकतो.

या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेबांनी सुध्दा विचार मांडलेले आहेत. वनेतर असलेल्या जमिनीत या जट्रोफाची लागवड करता येईल का असा मुद्दा त्यांनी मांडलेला आहे. रायगड, ठाणे या जिल्हयात मोठया प्रमाणात वनेतर जमिनी आहेत त्यामुळे या जमिनी जट्रोफासाठी उपलब्ध झाल्या तर त्याचा फायदा होऊ शकेल असे मत त्यांनी व्यक्त केलेले आहे. खरे ग्रामस्थांच्या सहभागातूनच जट्रोफाची लागवड ग्रामस्थ तयार असेल तर आमचा विभाग सुध्दा त्यादृष्टीने प्रयत्न करेल. आजच दिल्ली येथे पारंपारिक ऊर्जा याबाबतीतील धोरण ठरविण्याच्या संदर्भात बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. जट्रोफाच्या बाबतीत माननीय राष्ट्रपती हे सुध्दा अत्यंत आग्रही आहेत. त्यांनी राष्ट्रपती भवना जट्रोफाच्या संदर्भातील वेगवेगळया जातींची लागवड करुन सुरुवात केलेली आहे. याच्या पुढे जाऊन काय करता येईल, यासंदर्भातील प्रयोग कसे यशस्वी होतील यासाठी पुणे येथे 2000 एकर महाराष्ट्र सरकारकडे मागितलेली आहे. त्या ठिकाणी बायो फयूअल पार्क निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. जगात पेट्रोल, डिझेल निर्माण करण्यासाठी तसेच सीएनजी सारख्या गॅसला पर्यायी गॅस म्हणून पीएनजी गॅस निर्माण करणा-या सुध्दा वनस्पती उपलब्ध आहेत. पेट्रोल, डिझेलला पर्याय निर्माण करण्यासाठी ते वनस्पतीमधून निर्माण होऊ शकते. पेट्रोल, डिझेल वनस्पतीमधून निर्माण करण्यासाठी अभिनव योजना यशस्वी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. शरद पाटील साहेबांनी जट्रोफाच्या संदर्भात काही भावना व्यक्त केलेल्या आहेत. यासंदर्भात मी एकच सांगू इच्छितो की, ज्या जमिनीत काहीच उगवत नाही, ज्या जमिनीत पाण्याची सोय नाही अशा ठिकाणी जट्रोफाची लागवड केल्यानंतर उत्पन्न किती मिळते याचा विचार न करता जसे चहाच्या मळयाच्या ठिकाणी चहाच्या झाडाची पाने तोडण्याचा उद्योग तेथील कामगारांना मिळतो तशाच प्रकारचा उद्योग या ठिकाणी सुध्दा मिळू शकतो एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. त्यामुळे अशा ठिकाणी किमान बिया गोळा करण्याचा उद्योग येथील कामगारांना मिळू शकेल असे मला वाटते. अशा प्रकारचा जर उद्योग आपण महाराष्ट्रात निर्माण करु शकलो तर महाराष्ट्रातील 3-4 लाख लोकांना यापासून नवा उद्योग मिळण्याची शक्यता आहे. जट्रोफाची शेती म्हणून केली तर ती परवडणार

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे....

नाही असे या ठिकाणी सांगण्यात आलेले आहे. परंतु ज्या जमिनीत काहीच होत नाही त्या जमिनीत कष्ट घेऊन जट्रोफाची लागवड केली, जट्रोफा जगवला तर पुढील 35 वर्षे आपल्याला बिया गोळा करण्याचा उद्योग मिळू शकेल. आपण दर वर्षी 38 द.ल. टन डिझल आयात करीत असतो. त्यामुळे जट्रोफा लागवडीमुळे जर डिझल आयात करण्याचे प्रमाण कमी झाले तर त्याचा आपल्या आर्थिक परिस्थितीवर चांगला परिणाम होऊ शकेल. डिझेलला पर्याय म्हणून जट्रोफा आव्हान देऊ शकतो या दृष्टीने महाराष्ट्र सरकार गांभीर्याने प्रयत्न करीत आहे. जट्रोफाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या भावना अशाच पॉझीटीव्ह रहाव्यात अशी अपेक्षा व्यक्त करतो व यासंदर्भात आपले अजून काही प्रश्न असतील तर सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावेत.

----------

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय मंत्रीमहोदयांनी समाधानकारक उत्तर दिलेले आहे. नॅशनल बायो डिझल पार्क पुणे येथे निर्माण केला जाणार आहे व त्यासाठी महाराष्ट्र सरकार 2000 एकर जागा देणार आहे असे माननीय मंत्रीमहोदयांनी आताच सांगितलेले आहे. हा पार्क पुणे येथे होत आहे ही चांगलीच गोष्ट आहे. परंतु या पार्कला जमीन कशी काय उपलब्ध करुन देणार आहात याचा उल्लेख माननीय मंत्रीमहोदयांनी केलेला नाही त्यामुळे ही जमीन शेतक-यांची असणार आहे की, शासनाची असणार आहे याचा उल्लेख माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या भाषणात करावा अशी विनंती आहे. ज्या ज्या जिल्हयात जट्रोफाची लागवड करावयाची आहे ती रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधी तसेच संघटने कडून होत आहे. त्यामुळे यासंदर्भात लोकप्रतिनिधींना आणि संघटनाना विश्वासात घेऊन त्यांच्या बरोबर बैठक घ्यावी असे मला वाटते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. शरद पाटील साहेबांनी चांगले मुद्दे उपस्थित केलेले आहेत. परंतु मला वाटते या मुद्याच्या संदर्भात व्हायोबिलीटी लक्षात घेतलेली नाही. सुबाभुळीच्या बाबतीत घाईघाईने धोरण आखण्यात आले परंतु नंतर सुबाभूळ ही कुबाभूळ झाली तसे याबाबतीत होता कामा नये असे मला म्हणावयाचे आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे........

तेव्हा या संदर्भात व्यवस्थित नियोजन करणे अत्यावश्यक आहे. जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये हा विषय चर्चेसाठी घेतला तर त्यास व्यापक स्वरुप प्राप्त होऊ शकेल. सध्या बायोडिझलचे स्टेटस काय आहे ? महाराष्ट्रात पडीक जमिनीसाठी विकास महामंडळ निर्माण करण्यात आले होते, त्यावर सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे का ? की हे महामंडळ बरखास्त करण्यात आलेले आहे ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, पडीक जमिनीसाठी विकास महामंडळ निर्माण करण्या संबंधीची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. परंतु महाराष्ट्रात फलोत्पादन विभागामार्फत, रोजगार हमी योजनेमार्फत शेतक-यांना या योजनेचा फायदा देण्याचे धोरण शासनाने स्वीकारलेले आहे. ज्या जिल्ह्यात किंवा तालुक्यात अशाप्रकारची एकत्रित लागवड करण्यात येईल तेथे अपांरपारिक ऊर्जा विभागातर्फे प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी करण्याचे नियोजन आम्ही करीत आहोत. यास सर्वच क्षेत्रातून प्रोत्साहन मिळत आहे. शासनाकडून कोणतीही मदत न घेता शेतकऱ्यांनी 10 हजार हेक्टर क्षेत्रावर लागवड केलेली आहे. खाजगी उद्योजकांकडून सुध्दा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. आय.पी.सी.एल या कंपनीकडून अशाप्रकारच्या लागवडीसाठी काही जागा मिळू शकेल का, अशी विचारणा करण्यात आलेली आहे. टीना ऑईल, लातूर या सोयाबीनवर प्रक्रिया करणाऱ्या कंपनीने सुध्दा अशी विचारणा केलेली आहे. या सर्व गोष्टी घडत असताना या प्रकल्पास सेल्फ फिजिबिलीटी मिळू शकेल असे चित्र समोर येत आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुणे येथील जागेसंदर्भात विचारणा केली त्याबाबत मी सांगू इच्छितो की, शासकीय जागा घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी आम्ही दोन-तीन जागा पाहिलेल्या आहेत.

**तालिका सभापती ( श्री.विनोद तावडे )** : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सार्वजनिक महत्वाच्या विषयावर चर्चा

**पृ. शी.** : सार्वजनिक ठिकाणी भीक मागण्यावर असलेली बंदी

**मु. शी.** : सार्वजनिक ठिकाणी भीक मागण्यावर असलेली बंदी यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट, वि.प.स, यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. विलास अवचट ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारास निर्वाचित ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" सार्वजनिक जागी भीक मागणाऱ्याला पोलीस अटक करु शकतात, भीक मागण्याच्या हेतून गाणे, नाचणे, खेळ करणे, भविष्य सांगणे, वस्तू विकणे, यांवर असलेली बंदी, याकरिता मुंबईत भीक मागण्यास प्रतिबंध करणारा कायदा 1959 साली लागू करण्यात येणे, परंतु या कायद्यामुळे मुंबई राज्याच्या सरकारला आपदग्रस्तांसाठी मदत गोळा करणाऱ्यांवरही या कायद्यामुळे भिकारी ठरवून कारवाई होऊ शकते हे लक्षात आल्यावर 1964 साली आणखी एक अधिसूचना जारी करण्यात आली. परंतु सरकारी अधिकाऱ्यांनी त्यातील विसंगती लक्षात न घेताच अधिसूचना जारी केली, त्यामुळे भीक मागण्याचा परवाना-प्राधिकारपत्र नावाचे लायसेन्स देण्याचे या अधिसूचनेद्वारे जाहीर होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

सभापती महोदय, या सभागृहात नियम 92 अन्वये वेगवेगळ्या विषयावर चर्चा घडवून आणण्यात आलेल्या आहेत. मी या सभागृहात एक आगळा-वेगळा विषय अर्धा-तास चर्चेच्या रुपाने उपस्थित करीत आहे. दैनंदिन जीवनामध्ये नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत धकाधकीच्या जीवनामध्ये नागरिकंना भेडसावणाऱ्या प्रश्नाची बाजू मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे. मुंबईत भीक मागणे कायद्याने बंदी आहे. परंतु जेथे भीक मागणे कायद्याने बंदी आहे त्याचठिकाणी भीक मागण्याचा परवाना मिळत आहे. मुंबईतील पोलीस आयुक्त कार्यालय व जिल्हाधिकारी यांचेकडून अधिकृत परवाना देण्यात येत आहे. तेव्हा निश्चित काय परिस्थिती आहे हे जाणून घेण्यासाठी मी अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित केलेली आहे. भीक मागणारा भिकारी हा मुंबई शहराला कॅन्सर झालेला आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट.........

नाही. हा रोग नष्ट करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर शस्त्रक्रिया करण्याची गरज आहे आणि ही जबाबदारी राज्य शासनाची आहे.

सभापती महोदय, मुंबईत भीक मागण्यावर बंदी करणारा कायदा 1959 मध्ये झाला आणि या कायद्यामुळे आपदग्रस्तांसाठी मदत गोळा करणा-यांनाही भिकारी ठरवून कारवाई होऊ शकते. म्हणजे त्सुनामी सारख्या नैसर्गिक संकटांसाठी किंवा 26 जुलै 2005 रोजी झालेल्या अभूतपूर्व पावसामध्ये अनेकांचे गेलेले बळी यासाठी मदत गोळा केली तर तो कायद्याने गुन्हा होऊ शकतो हे लक्षात आल्यावर 1964 मध्ये अधिसूचना जारी करण्यात आली. म्हणजे भीक मागण्यासाठी चक्क परवाना लायसन्स मिळण्याची व्यवस्था मायबाप सरकारने करुन टाकली. ही अधिसूचना तयार करणारा सुपीक डोक्याचा अधिकारी कोण आहे हे समजत नाही.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 11:05

श्री.विलास अवचट...

मूळ कायदा भीक मागण्यास बंदी आणि दुरुस्ती भीक मागण्यासाठी परवाना देण्याचा असून याची सांगड कशी घालायची, हे माननीय मंत्री महोदयांनी याठिकाणी सांगावे. आता प्रश्न निर्माण होतो की, सन 1964 च्या दुरुस्तीनंतर जवळपास 42 वर्षात किती परवाने देण्यात आले, त्यासाठी किती अर्ज आले ? या सर्व प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांनी द्यावीत. याठिकाणी असे परवाने दिले नसतील किंवा यासाठी अर्ज आले नसतील तर संबंधित विभाग या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी काय करीत होता ? हा प्रश्न याठिकाणी उपस्थित होतो. गेल्या पाच वर्षांत किती भिकाऱ्यांना पकडले ? व त्यांच्यावर किती खटले भरण्यात आले, याचीही माहिती मिळणे आवश्यक आहे. आणीबाणीच्यावेळी जॉर्ज फर्नांडिस मिळत नव्हते, म्हणून या कायद्याचा आधार घेऊन, त्यांनी भिकाऱ्याचा वेष घेतला आहे की काय म्हणून भिकाऱ्यांची धरपकडही करण्यात आली होती. अशा प्रकारे राजकीय नेत्यांना वेष घ्यावा लागत असेल तर ती मोठी शोकांतिका आहे. सरकारने भीक मागण्यासाठी चक्क परवाना कायदा केल्याची बातमी सर्वत्र पसरल्याने की काय मुंबईतील भिकाऱ्यांची संख्या मारुतीच्या शेपटाप्रमाणे वाढतच गेली आणि 1963 मध्ये भिकाऱ्यांची संख्या 20 हजार होती ती सन 1992 मध्ये दीड लाख झाली आणि सन 2004 मध्ये 3 लाखापर्यंत गेली. सन 1959 मध्ये मुंबईत जन्मलेल्या भिकाऱ्यांचे प्रमाण केवळ दोन टक्के होते. बाकी सर्व बाहेरुन आलेले होते. त्यामध्ये धडधाकट भिकाऱ्यांचे प्रमाण 47 टक्के होते. सन 2004 च्या एका पाहणीनुसार 3 लाख भिकाऱ्यांमध्ये 90 टक्के भिकारी हे इतर प्रातांतून आलेले आहेत. विमानतळ, मोठी रेल्वे स्थानके, सिनेमागृहे, हॉटेल्स, पर्यटन स्थळे यांच्याजवळ विदेशी पर्यटकांच्या मागे लागून त्यांना मानसिक त्रास देणाऱ्या या भिकाऱ्यांमुळे "कुठून आलो हिंदुस्थानात" अशी भावना या पर्यकांची होत असेल तर नवल वाटू नये. आम्ही मुंबईकर किती कनवाळू, ममताळू आहोत याचा प्रत्यय दिसून येतो. 3 लाख भिकाऱ्यांची महिन्याची कमाई 40 ते 50 कोटी रुपये आहे. सभापती महोदय, भिकाऱ्यांचे नऊ प्रकार आहेत. त्यामध्ये हातपाय तुटलेले, म्हातारपणाकडे झुकलेले पुरुष व स्त्रिया, धडधाकट स्त्रिया व पुरुष, तृतीय पंथी, अंध, मुके, बहिरे, कुष्ठरोगी व इतर रोगी आणि 10 वर्षाखालील लहान मुले. यात धडधाकट स्त्रिया आणि तृतीय पंथी यांची रोजची कमाई 200-250 रुपये एवढी असून धडधाकट स्त्रिया 25 हजार आहेत व तृतीय पंथी 30 हजार रुपये आहेत. 10 वर्षांखालील मुलांची संख्या सर्वात जास्त म्हणजे 55 हजार आहे आणि त्यांची रोजची कमाई

..2....

श्री.विलास अवचट...

150-175 रुपये एवढी आहे. रोगी भिकाऱ्यांची कमाई सर्वात कमी म्हणजे 50-60 रुपये एवढी असून त्यांची संख्या जवळपास 15 हजार एवढी आहे. सभापती महोदय, या प्रश्नाची व्याप्ती फार मोठी आहे, हे आपण लक्षात घ्यावे. ग्रामीण भागामध्ये रोजगार हमी योजनांच्या कामांवर काही भागात तर मजूरही मिळत नाहीत, त्यामुळे येथील धडधाकट भिकाऱ्यांना उचलावे आणि त्याठिकाणी त्यांना कामाला लावावे,असे मला वाटते. तसेच, या कायद्यातील "परवाना" हा काढून टाकून तो कठोरपणे राबवून मुंबई आणि इतर जिल्हे भिकाऱ्यांविना करण्याचे आव्हान हे सरकार स्वीकारेल का ? हा खरा प्रश्न आहे. माननीय गृहमंत्र्यांनी याठिकाणी डान्सबार बंद केले, आता आपण भिकाऱ्यांचा प्रश्न हातात घ्यावा, यासाठी मी याठिकाणी ही अर्धा-तासाची सूचना मांडलेली आहे.

-----

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 1964 च्या अधिनियमातील कलम 3(3) नुसार जो 'अे' फॉर्म आहे तो इंग्रजी भाषेमध्ये आहे. इंग्रजी भाषेतील शब्दप्रयोग योग्य असून या फॉर्मचे जे मराठी भाषांतर करण्यात आले आहे त्यामध्ये "भीक" हा शब्द आलेला आहे. यासाठी नियमामध्ये दुरुस्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला असून ताबडतोबीने अध्यादेश काढण्याचा विचार झाला आहे. 'अे' फॉर्ममध्ये असे दिलेले आहे की, "- Is authorized to solicit or receive money for the purpose of" ही सर्व इंग्रजी वाक्यरचना बरोबर आहे. जो मराठीतील फॉर्म आहे त्यामध्ये चुकीचा शब्दप्रयोग झालेला आहे. त्यामुळे 'भीक' या शब्दाऐवजी 'आपदग्रस्त' असा शब्द नियमातील दुरुस्तीमध्ये टाकण्यात येणार आहे. सन 2005 मध्ये मुंबईमध्ये 13193 भिका-यांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे व त्यांना न्यायालयासमोर उभे करण्यात आले आहे. यापैकी 13008 भिका-यांना न्यायालयाने ताब्यात घेतले असून 185 भिका-यांना सोडून देण्यात आले आहे. मे, 2006 पर्यन्त 3754 भिका-यांविरुध्द कारवाई करण्यात आली, यापैकी 3382 भिका-यांना ताब्यात घेऊन 72 भिका-यांना सोडून देण्यात आलेले आहे. भिका-यांचे महिन्याचे उत्पन्न जवळ जवळ 50 कोटी रुपये असल्याची जी वस्तुस्थिती सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात मांडली, ती बरोबर आहे. पोलिसांकडून आम्हाला जी माहिती मिळाली आहे त्यानुसार भिका-यांचे वार्षिक उत्पन्न जवळ जवळ 180 कोटी रुपये आहे. सन्माननीय सदस्यांनी अशी सूचना केली आहे की, भिका-यांना रोजगार हमी योजनेच्या कामांवर रोजगार उपलब्ध करुन द्यावा. त्यांनी केलेली सूचना निश्चितच स्वागतार्ह असून या सूचनेचा विचार करण्यात येईल. सभापती महोदय, अधिनियमात शब्दप्रयोगातील दुरुस्ती केल्यानंतर जे भिकारी रस्त्यारस्त्यांवरुन फिरतात त्यांना बाहेर काढण्याचे काम, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे काम पोलीस विभागाच्या माध्यमातून करता येईल. शेवटी मी एवढेच सांगू इच्छितो की, अशा प्रकारची दुरुस्ती झाल्यानंतर परिस्थिती सुधारेल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, जी लहान मुले भीक मागतात त्यांना बालमजूर कायद्यांतर्गत प्रतिबंध करता येणार नाही काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, सूचनेचा विचार करण्यात येईल.

..2..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांना मी धन्यवाद देऊ इच्छितो की, त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे या सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर उपस्थित झालेल्या चर्चेला उत्तर दिले आहे. मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरात सांगितले की, इंग्रजीचे मराठी भाषांतर करतांना चूक झालेली आहे. सभापती महोदय, मराठी ही या राज्याची राजभाषा आहे. पेशव्यांच्या काळात 'ध' चा 'मा' झाल्याने काय घडले होते, याची आपल्याला कल्पना आहे. तेंव्हा, अशा प्रकारची चूक महाराष्ट्रात तरी होणे योग्य नाही, एवढेच मी नमूद करतो. त्याचप्रमाणे ही चूक आता दुरुस्त करण्यात येईल काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, माझ्या भाषणात ही चूक दुरुस्त करण्याबाबत शासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे, अशा प्रकारचे उत्तर मी अगोदरच दिलेले आहे. यासंबंधीचा शासन निर्णय लवकरात लवकर निर्गमित करण्यात येईल.

**तालिका सभापती (श्री.विनोद तावडे)** : अर्धातास चर्चा संपली आहे.

-----------------

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईमधील महात्मा गांधी रुग्णालय सर्वसाधारण लोकांसाठी खुले करणे

**मु. शी.** : मुंबईमधील महात्मा गांधी रुग्णालय सर्वसाधारण लोकांसाठी खुले करणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" मुंबईमधील परळ भागात महात्मा गांधी रुग्णालय हे इ.एस.आय.एस.मध्ये येत असल्याने हया रुग्णालयात फक्त मिल कामगारांनाच प्रवेश दिला जातो. या रुग्णालयात 1990 सालापासून गिरण्या बंद पडल्यानंतर 330 खाटा आहेत, परंतु रुग्ण 160 आहेत. बाकी सर्व खाटा रिकाम्या आहेत. हे रुग्णालय सर्वसाधारण रुग्णालय करण्यात आल्यास बाकी 170 खाटांचाही वापर होईल व परळ भागातील रहिवाश्यांना व इतर सरकारी रुग्णालयांना त्याचा उपयोग होईल. मे,2004 साली रुग्णालयाच्या डायरेक्टर बोर्डाची बैठक झाली. तसेच 18 मे 2005 ला एक बैठक झाली. यामध्ये ट्रस्ट डीडीमध्ये बदल करुन घ्यावा असे एकमताने ठरले असून अजूनपर्यन्त शासनाकडून या गंभीर व महत्वपूर्ण विषयावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. या रुग्णालयाच्या जवळच के.ई.एम., टाटा कॅन्सर, वाडीयासारखी मोठी रुग्णालये असून त्यांच्याकडे येणा-या रुग्णांची संख्या मोठी असून त्यांना त्यांच्याकडच्या सोयी अपु-या पडत आहेत. त्याकरिता महात्मा गांधी रुग्णालय सर्वसाधारण लोकांकरिता खुले करण्यात आले तर परिसरातील इतर रुग्णालयांवरील रुग्ण संख्येचा ताण कमी होण्यास मदत होईल, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

सभापती महोदय, मुंबई शहरातील परळ भागात महात्मा गांधी रुग्णालय सार्वजनिक करावे, या मागणीसाठी ही अर्धा तासाची चर्चा मी उपस्थित केली आहे. यासंबधी दि. 21 मार्च 2006 रोजी या सभागृहामध्ये प्रश्नोत्तरे झाली होती. या ठिकाणी घेतलेल्या निर्णयांची, दिलेल्या आश्वासनांची प्रभावी अंमलबजावणी होते, असा आम्हाला अनुभव नाही. अर्धा तासाची चर्चा असो,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4..........

श्री.मधुकर चव्हाण.........

लक्षवेधी सूचनेवरील चर्चा असो, सार्वजनिक हिताचा प्रश्न असो, सामान्य जनतेशी संबंधित विषय असो, अशा प्रश्नांसंबंधी दिलेल्या आश्वासनांची, घेतलेल्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी शासनाकडून होत नाही, हे मी या ठिकाणी अतिशय खेदाने नमूद करतो. सामाजिक नाही तर कर्तव्य भावनेतून अंमलबजावणी करा, अशी माझी शासनाला विनंती आहे. परळ येथील महात्मा गांधी रुग्णालय हे पूर्वी मील कामगारांसाठी होते व त्यावेळी ते रुग्णालय 700 खाटांचे होते. सन 1984 मध्ये व्यापक संप झाल्यानंतर सन 1990 मध्ये हे रुग्णालय 330 खाटांचे करण्यात आले. आज त्या ठिकाणी 160 रुग्ण आहेत. यासंबंधी दि.21 मार्च 2006 रोजी मागच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये मी प्रश्न उपस्थित केला होता.

यानंतर श्री.बोरले........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ........ 11:15

श्री.मधुकर चव्हाण ..........

सभापती महोदय, आपणही काही उप प्रश्न विचारले होते. मी असा प्रश्न विचारला होता की, मुंबईमधील परळ भागातील महात्मा गांधी रुग्णालय फक्त कामगारांसाठी आहे काय ? या प्रश्नाचे "होय" असे उत्तर दिले होते. दुसरा प्रश्न असा विचारला होता की, हे रुग्णालय पुनर्जिवीत करण्यासाठी, सामान्य रुग्णांना या रुग्णालयामध्ये प्रवेश मिळावा याकरीता शासन प्रयत्न करणार आहे काय ? या प्रश्नाचे असे उत्तर देण्यात आले होते की, "प्रश्न उद्‌भवत नाही". सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित झाल्यानंतर शासनाच्यावतीने सावर्जनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले होते की, हे ई.एस.आय.एस. हॉस्पिटल आहे. जनरल हॉस्पिटल व्हावे यासंदर्भात बोर्ड ऑफ मॅनेजमेंटकडे ठराव गेलेला आहे. कमिशनर ई.एस.आय.एस., रिजनल डायरेक्टर, सेक्रेटरी, मिल ओनरर्स असोसिएशन आणि मेडिकल सुपरिटेंडेंट एम.जी.एम. हॉस्पिटल यांचे सर्वांचे ठराव होणे आवश्यक आहे. यासंदर्भात सन 2004 मध्ये बैठक होऊन हे हॉस्पिटल कामगारांसाठी अधिक सार्वजनिक रुग्णालय करावे, असा ठराव झाला. मेडीकल डायरेक्टरकडे ठराव होणे आवश्यक आहे. माननीय मंत्री डॉ. विमल मुंदडा यांनी असे सांगितले होते की, सार्वजनिक आरोग्य विभाग यांची याबाबतीत दिनांक 18.5.2005 रोजी मिटींग झाली. याबाबतीत शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा आहे. त्यानंतर शेवटी असे सांगितले होते की, हॉस्पिटलला अर्थपुरवठा शासन करीत असल्यामुळे शासन निर्णय घेऊ शकते. आम्ही हा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविणार आहोत. त्यानंतर असे म्हटले आहे की, मागील दोन महिन्यांपूर्वी केंद्र शासनाची टीम आली होती. त्यांच्याबरोबर माननीय मंत्री महोदयांनी आणि मी स्वत: जाऊन चर्चा केली होती. आयुक्तांना विनंती केली की, तुम्ही स्वत: येऊन इमारतीची पाहणी करा. चेअरमन दिल्लीचे असल्यामुळे त्यांना या ठिकाणी येण्यास वेळ लागेल. शासन पाठपुरावा करीतच आहे. एकमताने ठराव केलेला असल्यामुळे आम्हाला कोणतीही अडचण येणार नाही. एका महिन्यामध्ये आमच्या दोघांपैकी कोणी तरी केंद्र शासनाकडे जाईल आणि याचा पाठपुरावा करण्यात येईल. सभापती महोदय, मुंबई शहरातील के.ई.एम., नायर, लोकमान्य टिळक या हॉस्पिटलमधील एका युनिटमध्ये 25 खाटा असणे आवश्यक आहे. परंतु तेथे 50-60 खाटा असतात. हॉस्पिटलमध्ये अपेक्षित असलेली रुग्णांची संख्या आणि प्रत्यक्ष असलेली रुग्णांची संख्या लक्षात घेतली तर कितीही कार्यक्षम डॉक्टर असले

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ........ 11:15

श्री.मधुकर चव्हाण ...........

तरी ते रुग्णांना चांगली सेवा दऊ शकत नाहीत. मागच्या वर्षी झालेल्या महापुराच्या वेळी आपल्याला याचा अनुभव आला आणि आता बॉम्बस्फोटाच्या वेळी देखील आला. त्यावेळी शवागारामध्ये मृतदेह ठेवण्यासाठी जागा नव्हती. महात्मा गांधी रुग्णालयाचा परिसर मोठा आहे. या हॉस्पिटलमध्ये 58 स्टाफची आवश्यकता आहे. तेथे 52 स्टाफ आहे. महात्मा गांधी रुग्णालयाच्या बाजूला जी रुग्णालये आहेत त्या रुग्णालयांची स्थिती भयानक आहे. सभापती महोदय आपण आणि सन्माननीय सदस्य श्री.गोपीनाथ मुंडे तेथे आला होतात. त्यावेळी मृतदेह उघडयावर चादरी टाकून ठेवलेले होते. मृतदेह ठेवण्यासाठी शवागारामध्ये जागा नव्हती. स्टाफला राहण्यासाठी तेथे कॉर्टर्स उपलब्ध आहेत. तेथे फक्त 160 रुग्ण आहेत. रुग्णालयाचे युनिट प्रमुख व सुपरिटेंडेंट यांची अशी इच्छा आहे की, हे रुग्णालय चांगले झाले पाहिजे. माझी अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, महात्मा गांधी रुग्णालय सर्वाकरीता खुले करण्यासाठी मंत्री महोदयांनी दिल्लीला जावे. मला मंत्री करा, मला ही जागा द्या, यासाठी केंद्र शासनाकडे जातात. परंतु यासंबंधीचा पाठपुरावा करण्यासाठी केंद्र शासनाकडे कोणीही जात नाही.

यानंतर श्री.सुंबरे ..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

अशाप्रकारे आरोग्याचे प्रश्न असोत किंवा गृहनिर्माणाचे प्रश्न असोत ते केंद्रामध्ये प्रलंबित पडले आहेत. ते सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करावेत. म्हणून यानिमित्ताने मला आपल्याला विचारावयाचे आहे की, गेल्या मार्च महिन्यामध्ये या प्रश्नावर चर्चा झाली आहे आणि जो निर्णय झाला आहे, त्याप्रमाणे परळ येथील महात्मा गांधी रुग्णालयाचे रुपांतर सर्वसाधारण रुग्णालयामध्ये करण्यात यावे. जेणेकरुन आजुबाजूच्या परिसरातील लोकांना सुध्दा त्या रुग्णालयाच्या सेवेचा फायदा घेता येईल. त्यादृष्टीने शासनाने निर्णय घ्यावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सार्वजनिक दृष्टया अतिशय महत्वाच्या असलेल्या विषयावर माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे. त्याबद्दल सर्वप्रथम मी माननीय सदस्यांना धन्यवाद देतो. अशाप्रकारच्या विषयावर सभागृहामध्ये चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. माननीय सदस्यांनी सातत्याने या विषयाचा पाठपुरावा केल्यानंतर त्यांनी याठिकाणी अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे. सभापती महोदय, मुंबईमध्ये इ.एस.आय.एस. ही योजना फक्त कामगारांसाठी राबविली जात असल्यामुळे त्यामधून फार मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या शहरामध्ये अशाप्रकारची अनेक हॉस्पिटल्स आहेत त्यांच्या संदर्भात सुध्दा चर्चा झाली पाहिजे. ही बाब केंद्र सरकारच्या अखत्यारीत असल्यामुळे राज्य सरकार नेहमी केंद्र सरकारकडे बोट दाखविते. आणि त्या संदर्भातील आपली जबाबदारी झटकून टाकते असा आमचा अनुभव आहे. परळ येथील महात्मा गांधी रुग्णालयाबाबत बोलावयाचे झाले तर त्याठिकाणी माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे 330 खाटांपैकी फक्त 160 खाटा शिल्लक आहेत. आज मुंबई शहरामध्ये सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल होणे अत्यंत आवश्यक आहे. या शहरामध्ये जे गरीब लोक आहेत ते हिंदूजा, लिलावती, बॉम्बे हॉस्पिटल या पंचतारांकित हॉस्पिटलमध्ये उपचार घेण्यासाठी जाऊ शकत नाहीत. त्यासाठी अशाप्रकारचा एक सेमी चॅरिटेबल विभाग असणे आवश्यक आहे. त्याठिकाणी अत्यंत नॉमिनल रेटमध्ये शस्त्रक्रिया होऊ शकेल अशाप्रकारचे हॉस्पिटल निर्माण केले पाहिजे. आज त्याठिकाणी आपले इन्फ्रास्ट्रक्चर तयार आहे, निष्णात डॉक्टर उपलब्ध आहेत, ऑपरेशन थिएटर उपलब्ध आहे, परंतु त्याठिकाणी उपकरणांची कमतरता आहे. त्यासाठी या शासनाला विनंती आहे की,आपण या हॉस्पिटलसाठी एक प्रोजेक्ट वर्कआऊट करावा. आणि त्याठिकाणी असलेली उपलब्ध जागा आणि बेड्स यांचे वर्गीकरण करावे. तसे केले तर त्याठिकाणी कॅन्सरसारख्या गंभीर आजार असलेल्या रुग्णांची सुध्दा व्यवस्था होऊ शकते. तेव्हा अशा हॉस्पिटलचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये रुपांतर करुन त्याठिकाणी उपचारासाठी येणाऱ्या गरीब रुग्णांकरिता इन्कम ग्रुप ठरविण्यात यावेत. त्यादृष्टीने नियम तयार करण्यात यावेत. अशाप्रकारे कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेण्यासाठी जाणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासलेल्या वर्गासाठी निकष तयार करुन त्या लोकांना त्याठिकाणी ॲडमिशन देऊन, ऑपरेशन करणे इत्यादी गोष्टींचा लाभ त्यांना मिळणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, मुंबईमध्ये मॉरच्युरीची अत्यंत आवश्यकता आहे. त्यांची कमतरता असल्यामुळे डेड बॉडी बरेच दिवस पडून राहतात. या संदर्भात मागील आठवडयात झालेल्या बॉम्बस्फोटाच्या वेळी आपल्याला अनुभव आला आहे. याकरिता हॉस्पिटलच्या मोकळया असलेल्या भागामध्ये आपल्याला मॉरच्युरी बांधता येईल आणि त्यांचा उपयोग आपल्याला करता येईल. सभापती महोदय, शैक्षणिकदृष्टया आपल्याला तो भाग खरोखरच विकसित करावयाचा असेल तर त्याठिकाणी एज्युकेशनल इंस्टिटयूट आपल्याला निर्माण करता येईल. त्याठिकाणी पोस्ट ग्रॅज्युएट कोर्सेस सुरु करता येतील. के.ई.एम. आणि कूपर रुग्णालयामध्ये हे कोर्सेस सुरु होते परंतु ते बंद झाले आहेत. अशाप्रकारे आपण पोस्ट ग्रॅज्युएट कोर्सेस सुरु केले तर त्याठिकाणी उपलब्ध असलेले डॉक्टर, सर्जन यांचा देखील आपल्याला उपयोग करुन घेता येईल. एम.बी.बी.एस. झालेले डॉक्टर्स सुध्दा त्याठिकाणी शिक्षण घेण्यासाठी येतील. अशाप्रकारची व्यवस्था निर्माण करण्यासंबंधी शासनाने संदिग्धता न बाळगता स्वत:हून पुढाकार घेऊन त्याकरिता दिल्ली येथे जाऊन जी काही बैठक घेणे आवश्यक असेल ती घ्यावी. आणि पुढील अधिवेशनामध्ये हा विषय प्रॅक्टिकल स्वरुपामध्ये आणावा अशी विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून अत्यंत महत्वाचा विषय सभागृहामध्ये मांडला आहे. या संदर्भात मला फक्त एकच दुरुस्ती करावयाची आहे की, त्यांनी बोर्ड ऑफ डायरेक्टरची बैठक 2004 साली झाली असा उल्लेख केला आहे. ही बैठक 2004 मध्ये झालेली नसून ती 2005 मध्ये झाली आहे. त्याचप्रमाणे त्यांना सांगू इच्छितो की, बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची संख्या 6 होती. त्यापैकी एका संचालकांना बदलण्यात आले असल्यामुळे नवीन बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनी पुन्हा बैठक घेऊन या प्रस्तावाला मान्यता दिली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे.... 11:25

श्री.रणजित कांबळे (पुढे सुरु...

हा प्रस्ताव दिल्लीला पाठविलेला आहे. त्याचा पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने सन्माननीय मंत्री महोदयांनी दिल्लीला जाऊन इ.एस.आय.चे डायरेक्टर जनरल आहेत, त्यांच्याशी त्यांनी चर्चा केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी दोन-तीन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ओ.पी.डी.,आय.पी.डी. सुरु करण्याबाबत सांगितले. नंबर ऑफ अक्युपन्सी ऑफ बेड कमी झालेला आहे. म्हणूनच शासनाने निर्णय घेतलेला आहे की, सार्वजनिक लोकांसाठी ते रुग्णालय खुले करावे. याबाबतचा प्रस्ताव बोर्ड ऑफ डायरेक्टरकडून आलेला आहे. त्यातील एक डायरेक्टर बदलला. त्या ठिकाणी इक्वीपमेंट कमी आहेत, यासाठी आम्ही आता बजेटमध्ये तरतूद करणार आहोत.

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.विलास अवचट)

नवीन इक्वीपमेंटसाठी अकरा ते सव्वा अकरा कोटी रुपयाची तरतूद करणार आहोत. त्यामधून इक्वीपमेंट खरेदी करणार आहोत. बॉम्बस्फोट झाले, त्यावेळेस अंधेरीचे 100 बेडचे हॉस्पिटल आणि त्या ठिकाणी डॉक्टर आणि औषधे उपलब्ध करुन ठेवलेली होती. डिझास्टर मॅनेजमेटसाठी पोलीस कंट्रोल रुमला ते जोडलेले होते. त्यावेळेस सगळे डॉक्टर तयार होते. सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मुंबईमध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची गरज आहे. अंधेरीचे हॉस्पिटल सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये कन्व्हर्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. या संदर्भात एन.ओ.सी. घेण्यामध्ये काही अडचण् नाही. तसा प्रस्ताव प्रपोज करणार आहोत. म्हणून या प्रश्ना संबंधी शासन गंभीर नाही, असे नाही, शासन या विषयामध्ये गंभीर आहे. म्हणूनच मंत्री महोदया दिल्लीला जाऊन तेथील डायरेक्टरांशी चर्चा करुन आलेल्या आहेत. केंद्रीय मंत्री माननीय श्री.शरद पवार साहेबांचेही या प्रकरणी सहकार्य घेतलेले आहे. ई.एस.आ.च्या डायरेक्टरबरोबर,आरोग्य सचिवांबरोबर बैठकही झालेली आहे. लवकरात लवकर सामान्य जनतेला ते हॉस्पिटल खुले करणार आहोत.

श्री.मधुकर चव्हाण : मला हेत्वारोप करायचा नाही. मी स्पष्टपणाने सांगतो की, 1990 साली युती सरकारच्यावेळी आमच्या हातून या संबंधीचे प्रयत्न झाले नाहीत, हे मान्य करतो. महात्मा गांधी हॉस्पिटलमध्ये डॉक्टर नाहीत. 700 खाटांचे हॉस्पिटल आहे, त्याचे मेन्टेनन्स होऊ शकत नाही, हॉस्पिटल निकामी झालेले आहे त्यामुळे तेथे पेशंट येऊन काय करणार आहेत ? आमचे म्हणणे आहे की, केंद्राची रितसर परवानगी येईपर्यन्त "विशेष बाब" म्हणून त्या ठिकाणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु...

330 खाटा उपलब्ध आहेत, तेव्हा सर्वसामान्य रुग्णांसाठी ओ.पी.डी. सुरु करावी. लगेच कोट्यावधी रुपये खर्च करायला सांगत नाही. आज 52 डॉक्टर आहेत. केंद्राच्या परवानगीची वाट पाहू नये.आज कस्तुरबा हॉस्पिटल हे एकमेव साथीच्या रोगासाठी आहे. आपण केईएम हॉस्पिटीलमध्ये पाहिले तर त्या ठिकाणी रुग्णांची गर्दी वाढलेली आहे. त्या ठिकाणी पेड्रेयाट्रिक, गायनॅक या वॉर्डामध्ये रुग्णांची गर्दी वाढलेली आहे. त्या ठिकाणी युरीन पॉट बदलू शकत नाही, चादर बदलू शकत नाही, अशी अवस्था आहे. गरिबांची काय अवस्था आहे ? हे अधिवेशन संपल्यानंतर दिल्लीला जाऊन प्रयत्न करावेत. त्यांच्याकडून मान्यता येईपर्यन्त रुग्णांची सेवेसाठी ओ.पी.डी.सुरु करावी. आज डोके दुखत असेल तर त्याचेही औषध मिळत नाही.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये ज्या ठिकाणी कंपाऊंडरकडून औषध मिळते त्या वॉर्डसमोर 150 ते 175 पेशन्ट्स रांगेमध्ये उभे असतात. खिळा लागून जखम झाली तर त्यासाठी औषध घेण्यासाठी 100 पेशन्ट्स त्या ठिकाणी उभे असतात. महापालिकेची रुग्णालये ओव्हर क्राऊडेड आहेत आणि बाजूला असलेले गांधी हॉस्पिटल पेशन्टची वाट पाहात बसलेले आहेत. जे.जे. हॉस्पिटलमध्ये ओव्हर क्राऊड आहे. आपण महात्मा गांधी हॉस्पिटलमध्ये ओपीडी सुरु करावी अशी विनंती आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, के.ई.एम.हॉस्पिटल हे महापालिकेचे हॉस्पिटल आहे. इ.एस.आय.एस. योजना ही कामगारांसाठी आहे. मुंबई शहरामध्ये हॉस्पिटलची गरज आहे हे लक्षात घेऊन महात्मा गांधी हॉस्पिटल सर्वसामान्य जनतेसाठी खुले करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. परंतु जोपर्यंत ट्रस्ट डीड मध्ये बदल होणार नाही...

श्री. मधुकर चव्हाण : एकमताने हा निर्णय झालेला आहे.

श्री. रणजित कांबळे : प्रोसीडिंगमध्ये ट्रस्ट डीड कन्फर्म करावी लागते. त्या ठिकाणी प्रश्न निर्माण झाला. त्यांची बैठक झाल्यानंतर एक डायरेक्टर बदलले. त्यामुळे थोडा उशीर झाला. परंतु शासन या विषयाबद्दल गंभीर आहे. संबंधित माननीय मंत्रिमहोदया स्वत: गेल्या होत्या. मी आश्वासन देऊ इच्छितो की, यानंतर पाठपुरावा करण्यासाठी आमच्या आयुक्तांना स्वत: दिल्लीला पाठविणार आहोत. मी आपल्याला एका महिन्यात किंवा दोन महिन्यात करु असे सांगणे बरोबर होणार नाही. कारण एका महिन्यात हे झाले नाही तर पुन्हा आपण माझ्यावर आरोप करणार. परंतु मी प्रामाणिकपणे सांगू इच्छितो की, आमचे आयुक्त स्वत: जातील आणि ते लवकरात लवकर या गोष्टीचा पाठपुरावा करतील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मघाशी माननीय मंत्रिमहोदयांनी आवेशामध्ये सांगितले की, आम्ही डिझास्टर मॅनेजमेंटच्या दृष्टीने तयार होतो. माझा त्यांच्या वक्तव्यावर इतकाच आक्षेप आहे की, जर तुम्ही डिझास्टर मॅनेजमेंटसाठी तयार होता तर मुंबई महापालिकेच्या हॉस्पिटलमधील सगळे पेशन्ट्स लीलावती हॉस्पिटलमध्ये, हिंदुजा हॉस्पिटलमध्ये का गेले ? जे.जे.

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ SBT/ MHM

डॉ. दीपक सावंत .....

हॉस्पिटलमध्ये, कामा हॉस्पिटलमध्ये, सेंट जॉर्जेस हॉस्पिटलमध्ये पेशन्ट्स का गेले नाहीत ? तुमच्या सेवेवरचा लोकांचा विश्वास उडत चालला आहे ही तुमच्या आमच्यासाठी वाईट गोष्ट आहे. माझा प्रश्न असा आहे की, एक महिन्याच्या आत निदान त्या ठिकाणी सर्वसामान्यांसाठी ओपीडी तरी चालू करु असे आश्वासन माननीय मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री. रणजित कांबळे : मी आधी सांगितले की, जोपर्यंत ट्रस्ट डीड कन्फर्म होणार नाही, डीडमध्ये जोपर्यंत बदल होणार नाही तोपर्यंत ओपीडी चालू करु शकत नाही.

**तालिका सभापती** ( श्री. विलास अवचट ) : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मिरज (जि.सांगली) येथील सरकारी मालकीची इमारत न्यायालयास मिळण्याच्या मागणीबाबत

**मु. शी.** : मिरज (जि. सांगली) येथील सरकारी मालकीची इमारत न्यायालयास मिळण्याच्या मागणीबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 18128 ला दिनांक 5 जुलै, 2006 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात प्रा. शरद पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

प्रा. शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, "मिरज (जि.सांगली) येथील सरकारी मालकीची इमारत न्यायालयास मिळण्याच्या मागणीबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 18128 ला दिनांक 5 जुलै, 2006 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, मिरज शहरातील न्यायालयासाठी शासनाच्या मालकीची सध्या स्टेट बँकेच्या ताब्यात असलेली सिटी सर्व्हे नंबर 63/46, क्षेत्रफळ अंदाजे 800 चौरस मीटर, ही जागा मिळावी यासंबंधीचा प्रश्न मी उपस्थित केला होता आणि त्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले आहे की, सार्वजनिक बांधकाम खात्याने स्टेट बँकेकडून ही जागा ताब्यात घेतल्यानंतर उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. मी आपल्यामार्फत शासनाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, मिरज शहरातील सिटी सर्व्हे नंबर 63/46 ही मालमत्ता स्वातंत्र्यपूर्व काळातील मिरजेचे संस्थानिक श्री. पटवर्धन यांची होती. संस्थाने विलीन झाल्यानंतर ही मालमत्ता मुंबई सरकारकडे हस्तांतरित झाली आणि सध्या या मालमत्तेचे मालक सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन आहे. संस्थानिकांच्या काळामध्ये तत्कालीन संस्थानिकांनी ही मालमत्ता किंवा ही इमारत स्टेट बँक ऑफ इंडियाला आपले व्यवहार करण्यासाठी दिलेली होती.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 11:35

(प्रा. शरद पाटील...)

आणि त्या इमारतीचा वापर ट्रेझरी म्हणूनही होत होता. स्वातंत्र्योत्तरच्या अगदी अलीकडच्या काळामध्ये म्हणजे 1989मध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाने मिरज शहरामध्ये अन्यत्र स्वत:ची इमारत बांधली आणि त्या ठिकाणी आपले सर्व व्यवहार हलविले. आता त्या इमारतीमध्ये एक खोली स्टेट बँक ऑफ इंडियाने आपल्या वापरात ठेवलेली आहे. उर्वरित सर्व इमारत 15-16 वर्षापासून रिकामी पडून आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाने अन्यत्र स्थलांतर केल्यानंतर मिरज न्यायालयाच्या बार असोशिएशनने ही जागा न्यायालयासाठी मिळावी अशा प्रकारची मागणी महाराष्ट्र शासनाला केली. उच्च न्यायालयाकडे देखील त्यांनी मागणी नोंदवली. गेली 15-16 वर्षे मिरज बार असोशिएशनने ही जागा मिळण्यासाठी पाठपुरावा करुन देखील ही जागा बांधकाम विभागाने स्टेट बँकेकडून अद्याप आपल्या ताब्यात घेतलेली नाही. या इमारतीचा वापर होत नाही. सदर इमारतीची न्यायालयाला गरज आहे. अशी इमारत ताब्यात घेण्यामध्ये महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम खाते का कुचराई करीत आहे, असा माझा प्रश्न आहे. 2003मध्ये महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाने सांगली जिल्हा सत्र न्यायालयाला एक पत्र पाठविले असून त्या पत्रामध्ये असा उल्लेख केलेला आहे की, उच्च न्यायालयाने मिरज शहरासाठी मिरज आणि सांगली येथे अतिरिक्त जिल्हा न्यायालय आणि दिवाणी न्यायालय, उच्चस्तर ही न्यायालये मंजूर केलेली आहेत, परंतु जागेअभावी मिरजमध्ये हे न्यायालय सुरु होऊ शकत नाही. तरी त्वरित जागा उपलब्ध करुन घ्यावी, असे त्या पत्रामध्ये विधी व न्याय विभागाने जिल्हा सत्र न्यायालयाला कळविले आहे. त्यानंतर जिल्हा सत्र न्यायाधीशांनी सार्वजनिक बांधकाम, मिरज या कार्यालयाला 18.5.2003, 13.6.2003, 1.8.2003,6.8.2003 6.9.2003 आणि 24.6.2005 या तारखांना पत्रे पाठविली. या सर्व पत्रांच्या बाबतीत सार्वजनिक बांधकाम विभागाची एकच प्रतिक्रिया होती, ती म्हणजे त्यांनी स्टेट बँक ऑफ इंडियाला आपली जागा ताब्यात घेण्यासंबंधी पत्र पाठविले. त्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडियाने, ही जागा सोडण्यासाठी 4 महिन्यांची मुदत द्यावी, असे सार्वजनिक बांधकाम विभागाला 2005साली कळविले. त्या पत्राला उत्तर म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याने कळविले की, 4 महिन्याची मुदत देता येणार नाही, जागा ताबडतोब खाली करावी. या गोष्टीला जवळपास एक वर्ष होऊन गेले. सार्वजनिक बांधकाम विभागाने जागा ताब्यात घेण्याच्या बाबतीत कोणताही

..2..

(प्रा. शरद पाटील...)

पाठपुरावा केला नाही ही वस्तुस्थिती आहे. जर ही दोन्ही न्यायालये या ठिकाणी स्थापन झाली तर मिरज, कवठेमहांकाळ आणि जत या तिन्ही तालुक्यातील अशिलांना आणि वकिलांना सांगलीला जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याची पाळी येणार नाही. त्यांच्या कामाचा निपटारा मिरज शहरामध्ये होऊ शकेल. यादृष्टीने ही जागा सार्वजनिक बांधकाम विभागाने ताब्यात का घेतली नाही या संबंधीचा हा प्रश्न आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक 10 मार्च रोजी अध्यक्ष, मिरज ॲडव्होकेट बार असोशिएशन यांना पत्र लिहिले आहे. त्या पत्रामध्ये असे म्हटलेले आहे की, "सदर इमारतीचा ताबा बँकेने सविस्तर या खात्याकडे हस्तांतर केल्यानंतर जिल्हाधिकारी सांगली यांच्या समितीमधून जिल्हा न्यायालयास ही तळमजल्यावरील इमारत वर्ग करण्यास सहमती दर्शविल्यास तसेच शासनाने यास मंजुरी दिल्यानंतर स्टेट बँकेकडील तळमजल्यावरील ही इमारत जिल्हा न्यायालयास वर्ग करण्यास या खात्याची काहीही हरकत राहाणार नाही."

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

19-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) O.1

SGB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.शिगम 11:40

प्रा.शरद पाटील.........

खरे म्हणजे हे त्यांचे काम आहे. ते आपल्याला असे लिहितात? अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांनी हे पत्र लिहिलेले आहे. खरे म्हणजे त्यांना शरम वाटली पाहिजे. हे त्यांचे काम आहे. त्यांच्या मालकीच्या इमारतीत स्टेट बँक भाडेकरु आहे. स्टेट बँकेचे सर्व व्यवहार त्यांच्या स्वत:च्या इमारतीमध्ये चालतात. या इमारतीतील फक्त एकच खोली स्टेट बँकेने अडवून ठेवली आहे. अशा परिस्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागाला ही जागा ताब्यात घेण्यास कोणती अडचण आहे? मी मंत्रीमहोदयांना विनंती करतो की, त्यांनी तात्काळ ही जागा स्टेट बँकेकडून काढून घेऊन ती इमारत न्यायालयाकडे वर्ग करण्यासाठी प्रयत्न करावेत.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.शिगम 11:40

श्री.हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी सांगली जिल्हयातील मिरज येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची इमारत स्टेट बँकेच्या ताब्यात आहे ती रिक्त करुन घेऊन तिचा वापर न्यायालयासाठी व्हावा व मिरज ॲडव्होकेट बार असोसिएशनने देखील अशी मागणी केलेली आहे अशा प्रकारचा प्रश्न अर्धातास चर्चेच्या निमित्ताने उपस्थित केलेला आहे. सभापती महोदय, मिरज किल्ले भागातील संस्थानकालीन इमारत शासनाच्या मालकीची आहे हे खरे आहे. ही इमारत स्टेट बँकेला भाडे तत्वावर दिलेली असून ती स्टेट बँकेच्या ताब्यात आहे. स्टेट बँकेने 1989 साली नवीन इमारतीमध्ये प्रवेश केलेला आहे. परंतु या इमारतीचा ताबा अद्याप सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुपूर्द केलेला नाही. दरमहा भाडे रुपये 3139 याप्रमाणे मे, 2006 अखेरचे भाडे स्टेट बँकेने जमा केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे फक्त एका खोलीचा ताबा स्टेट बँकेकडे आहे, तेथे त्यांचे काम चालते आणि बाकी इमारत मोकळी आहे हेही खरे आहे. जोपर्यंत स्टेट बँक त्या इमारतीचा ताबा देणार नाही तोपर्यंत ती इमारत सार्वजनिक बांधकाम विभाग ताब्यात घेणार नाही. त्यांनी भाडे दिलेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने अनेकदा त्यांच्याशी पत्रव्यवहार केलेला असून शेवटचे पत्र दि.31.5.2006 रोजी पाठविलेले असून स्टेट बँकेने अद्याप इमारत रिक्त केलेली नाही किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात दिलेली नाही. तरी न्यायालयात जाऊन इमारत ताब्यात घेण्याचा प्रस्ताव त्यांनी तयार केलेला आहे.

सभापती महोदय, स्टेट बँक या नॅशनलाईज बॅकेने स्वत:ची इमारत तयार होऊनही कमी भाडयाची जागा आपल्या ताब्यात का ठेवावी असा प्रश्न निर्माण होतो. आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाला सांगणार आहोत, अजिबात भाडे स्वीकारु नका. स्टेट बँक शेवटची मुदत पाळणार नसेल तर न्यायालयात जाऊन इमारत ताब्यात घ्यावी. उच्च न्यायालयाला आम्ही कळविले आहे की, ही जागा उपलब्ध झाल्यानंतर अतिरिक्त जिल्हा न्यायालय त्याठिकाणी सुरु करणार आहोत. त्यासाठी ही जागा उपयोगात आणणे किंवा न आणणे हे उच्च न्यायालयावर अवलंबून आहे. उच्च न्यायालयाने सांगली जिल्हा न्यायाधीशांना दि.26 जून, 2006 रोजी पत्र लिहून कळविले आहे की, ही इमारत वापरासाठी कशी आहे याबद्दलचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच इमारतीचा उपयोग या न्यायालयासाठी करता येईल. विधी व न्याय विभागाचा मंत्री या नात्याने मला असे वाटते की, नव्याने मंजूर झालेले अतिरिक्त जिल्हा न्यायाधीशांचे कार्यालय आणि इतर न्यायालय असतील ती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ.....

पक्षकार आणि वकिलांना उपयोगाची आहेत. परंतु स्टेट बँकेने ती जागा आपल्या ताब्यात ठेवली आहे. ती जागा ताबडतोब मोकळी व्हावी आणि कोणत्याही परिस्थितीत लवकरात लवकर हे न्यायालय त्याठिकाणी सुरु होईल यादृष्टीने जे जे करता येईल ते करण्याचा शासनाचा निश्चितपणे प्रयत्न करणार आहे.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, वास्तविक पाहता शासनाच्या मालकीची इमारत आहे ती भाडे तत्वावर दिलेली आहे. ती इमारत काढून घेण्यासाठी न्यायालयात जाण्याची आवश्यकता नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने रितसर नोटीस देऊन स्टेट बँकेला त्या इमारतीतून कायदेशीर मार्गाने बाहेर काढण्याची व्यवस्था करावी अशी मागणी आहे ती शासन पूर्ण करील का? विधी व न्याय विभागाकडून महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला त्वरित ही जागा ताब्यात घेण्यासंबंधी सूचना दिल्या जातील का?

श्री.हसन मुश्रीफ : मी मघाशीच सांगितले की, ताबडतोब सार्वजनिक बांधकाम विभागाला कळवू. ही इमारत ताब्यात घेण्यासाठी स्टेट बँकेला शेवटची नोटीस दिली आहे, आणखी एकदा नोटीस द्यावी आणि कोर्टात जाऊन ताबा घ्यावा.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ...

ही जागा लवकरात लवकर ताब्यात मिळविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातील. आवश्यकता वाटल्यास कोर्ट केस सुरु होईल हे पाहिले जाईल.

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय, या प्रकरणात कूळ कायदा लागू होऊ शकतो काय? हे प्रकरण जर कोर्टात गेले तर या प्रकरणाचा निर्णय 8-10 वर्षे तरी लागू शकणार नाही. म्हणून माझी ही सूचना आहे की, यासंदर्भातील निकष बाजूला ठेवून, पोलिसांची मदत घेऊन ही इमारत ताब्यात घेण्यात येईल काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यासंदर्भात कुळ कायदा आहे की, नाही याची माहिती नाही. परंतु ही इमारत बळजबरीने ताब्यात घेणे योग्य नाही. परंतु ही जागा त्वरीत ताब्यात येईल यासाठी विभागाकडून प्रयत्न केले जातील.

**तालिका सभापती** : अर्धा-तास चर्चा संपलेली आहे.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अशासकीय माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचा-यांना वेतन संरक्षण मिळणे.

**मु. शी.** : अशासकीय माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचा-यांना वेतन संरक्षण मिळणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" महाराष्ट्रात अशासकीय माध्यमिक शाळामधील शिक्षकेतर कर्मचाऱ्याने शिक्षकाची अर्हता प्राप्त करुन शिक्षक संवर्गात बदल केल्यास पूर्वीच्या वेतनास संरक्षण न देता मानधन लागू केल्याने आर्थिक नुकसान होत आहे, अशा कर्मचा-यांना वेतन संरक्षण मिळण्यासाठी व शिक्षक सेवक योजनेतून सूट मिळण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना "

सभापती महोदय, या ठिकाणी ही अर्धातास चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. अशा शिक्षकांना 99-2000 मध्ये महाराष्ट्रामध्ये प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये नियुक्ती केलेली आहे. नवीन नियुक्त शिक्षकांना शासन त्यांना वेतन देत असते. यासंदर्भात 27.4.2000 रोजी जी.आर. काढण्यात आलेला आहे. सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रामध्ये वेतनश्रेणीवर नेमणूक करणे, मानधनावर नेमणूक देण्याची कंत्राटी पध्दत शिक्षण क्षेत्रात शासनाने लागू केलेली आहे. शिक्षण क्षेत्रातील कंत्राटी पध्दतीला सर्व स्थरातून विरोध झालेला आहे. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात एक पिटीशन दाखल करण्यात आले होते. यासंदर्भात सर्व माहिती घेऊन उच्च न्यायालयाने 10 ऑगस्ट, 2002 रोजी निर्णय दिलेला आहे. यासंदर्भात शासनाने शपथपत्र सादर केलेले आहे. त्यात म्हटले आहे की, आम्हाला या वर्षात जवळ जवळ 24700 शिक्षकांची भरती करावयाची आहे परंतु एकदम एवढया मोठया प्रमाणात शिक्षकांची

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

भरती केली तर शासनावर त्याचा आर्थिक बोजा पडेल त्यामुळे कंत्राटी पध्दतीने शिक्षकांची नेमणूक करावी लागणार आहे. यासंदर्भात न्यायालयाने विरोध दाखल केलेला आहे. ही पदे रिक्त राहू नयेत, तात्पुरती पदे भरण्यासाठी शिक्षण सेवक योजना लागू करण्यासाठी न्यायालयाने संमती दिली. सभापती महोदय, 13.10.2000 रोजी मान्यता देण्याच्या संदर्भात शासनाचे आदेश निघाले. शिक्षकांची नियुक्ती होत असतांना माध्यमिक शाळेमध्ये काम करणा-या शिक्षकेतर कर्मचा-यांमध्ये शिपाई किंवा अन्य कर्मचा-याला पदोन्नतीची संधी मिळत असते व त्यांच्या वेतनश्रेणीमध्ये वाढ होत असते. काही शिक्षकेतर कर्मचा-यांनी नोकरी करता करता आपले शैक्षणिक अर्हता वाढवून उच्च शिक्षण घेतलेले आहे. काही ठिकाणी तर या कर्मचा-यांनी एम.ए.,बी.एड. पर्यंत आपली अर्हता वाढवलेली आहे. या कर्मचा-यांनी शिक्षक म्हणून अर्ज केला तर या कर्मचा-यांचा विचार संस्थाचालक प्राध्यान्याने करीत असतात. यासंदर्भात शासनाचे 11.3.94 चे आदेश आहेत. यामध्ये म्हटले आहे की, शिक्षकेतर कर्मचा-यांनी शैक्षणिक अर्हता वाढविली, पात्रता वाढविली आणि सर्व अटी पूर्ण होत असतील तर या शिक्षकेतर कर्मचा-यांना इतर उमेदवारांप्रमाणे शिक्षक पदी नियुक्तीसाठी प्राधान्याने विचार करावा.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.........

अशाप्रकारे आज शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची क्वॉलिफिकेशननुसार नियुक्ती होत आहे. परंतु शिक्षकेतर कर्मचारी ज्या वेतनश्रेणीमध्ये काम करीत आहेत त्यांना शिक्षणसेवक म्हणून विभागाकडून मान्यता मिळत आहे. ज्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दहा-पंधरा-वीस वर्षे सेवा केलेली आहे, ज्यांचा पगार 10 हजार, 12 हजार आहे, त्यांना शिक्षणसेवक म्हणून नेमून त्यांना 4 हजार रुपये पगार देण्यात येत आहे. म्हणजे ज्या शिक्षकेतर कर्मचाऱ्याने स्वत:ची शैक्षणिक अर्हता उंचावली त्यास प्रोत्साहन देण्याऐवजी त्यास शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिली जाते हे योग्य नाही. अशाप्रकारे त्यांची नियुक्ती केल्यामुळे त्यांना दर महिन्याला किमान 6-7 हजार रुपयांचे नुकसान सोसावे लागत आहे. जर तो शिक्षकेतर कर्मचारी शिक्षणसेवक म्हणून तीन वर्षे राहिला तर त्याचे किमान अडीच लाख रुपयांचे नुकसान होत आहे. सभापती महोदय, खरे म्हणजे यात न्यायालयाची कोणतीही अडचण नाही. जे शिक्षक वेतनश्रेणीमध्ये काम करतात त्यांना शासनाने प्रोटेक्शन दिलेले आहे. जर एखाद्या शिक्षकाने राजीनामा दिला आणि त्याची नव्याने नियुक्ती करण्यात आली असेल तर, त्यालासुध्दा वेतनश्रेणीमध्ये प्रोटेक्शन दिलेले आहे. जे शिक्षकेतर कर्मचारी शिक्षक होतात त्यांना वेतनश्रेणीमध्ये संरक्षण देण्याची तरतूद आहे. ही नवीन नियुक्ती नाही. फक्त संवर्गात बदल झालेला आहे. नवीन नियुक्त्या मानधनावर करणे हे आम्ही समजू शकतो, परंतु ही नवीन नियुक्ती नाही. शिक्षकेतर कर्मचारी स्वत:ची क्वॉलिफिकेशन उंचावून तो शिक्षक या संवर्गात आलेला आहे. नॉन टिचिंगमधून टीचिंग संवर्गात आलेला आहे. एका संवर्गातून दुसऱ्या संवर्गात केल्यास त्यास वेतनश्रेणीमध्ये प्रोटेक्शन द्यावे असे शासनाचे आदेश आहेत. तसेच जर कोणी असा शिक्षकेतर कर्मचारी संवर्ग बदलत असेल तर त्याच्या पहिल्या संवर्गातील रजा सुध्दा दुसऱ्या संवर्गातील पदावरील खात्यात जमा होते. एखादा शिक्षकेतर कर्मचारी स्वत:ची शैक्षणिक अर्हता उंचावून शिक्षक होत असेल तर त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. परंतु अशा शिक्षकांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्त करण्यात येत असल्यामुळे त्यांचे महिन्याला 8-9 हजार रुपयांचे नुकसान होत आहे. एकप्रकारे त्यांच्यावर हा अन्याय आहे. महाराष्ट्रात शिक्षकेतर संवर्गातून शिक्षक संवर्गात आलेल्यांची संख्या फार कमी आहे. माझ्या ठाणे जिल्हयात केवळ तीन शिक्षक आहेत. प्रत्येक जिल्ह्यात असे हाताच्या बोटावर

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.........

मोजण्याइतके शिक्षक असतील. तेव्हा माझी शासनाला विनंती आहे की, शिक्षकेतर संवर्गातून शिक्षक संवर्गात आलेल्यांची वेतनश्रेणी संरक्षित करण्यात यावी. मी पुन्हा एकदा शासनाला सांगू इच्छितो की, ही नवीन नियुक्ती नाही, फक्त संवर्गात बदल झालेला आहे. तेव्हा शिक्षकेतर संवर्गातून शिक्षक संवर्गात नियुक्त झालेल्या शिक्षकांना शिक्षकांची वेतनश्रेणी देण्याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी अशी माझी विनंती आहे. ज्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नोकरी सांभाळून स्वत:च्या हिमतीवर उच्च शिक्षण घेतले त्यांना वेतनश्रेणीमध्ये प्रोटेक्शन द्यावे व त्यांच्यावर अन्याय करु नये, यासाठी मी ही अर्धा-तास चर्चेची सूचना मांडलेली आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूरे करतो.

-------------

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे ( नाशिक विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी अतिशय चांगला मुद्दा अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने उपस्थित केलेला आहे, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. शिक्षकेतर कर्मचारी आपली सेवा देत असताना स्वत:ची शैक्षणिक अर्हता वाढवितात, म्हणजे एम.ए., बी.एड. करतात. जेव्हा असे शिक्षकेतर कर्मचारी शिक्षक संवर्गात जातात, तेव्हा त्यांची नियुक्ती ही, नवीन नियुक्ती आहे असे समजता कामा नये.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे...

कारण त्यांनी अगोदर 8-10 वर्षे सेवा केलेली आहे त्यामुळे त्यांना वेतन संरक्षण मिळणे अत्यंत गरजेचे आहे. त्यांनी केलेली सेवा ग्राहय धरुन अशा प्रकारचे मानधन न देता शिक्षकाची वेतनश्रेणी द्यावी. त्यांना शिक्षण सेवक योजनेतून सूट देणे क्रमप्राप्त आहे कारण त्यांनी सेवा केलेली असते. याठिकाणी शिक्षण सेवकाची नवीन अपॉइन्मेंट धरली तर त्यामध्ये शिक्षकांचे फार मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे या सर्व गोष्टींचा उल्लेख याठिकाणी होणे आवश्यक आहे. शिक्षक हा पूर्वी शिक्षकेतर सेवेमध्ये असल्यामुळे त्यास शिक्षण सेवक न समजता त्याला पे-प्रोटेक्शन देऊन शिक्षकाची वेतनश्रेणी द्यावी. ज्या शिक्षकेतर कर्मचा-यांनी शैक्षणिक अर्हता मिळवलेली असेल अशा शिक्षकांना प्रे-प्रोटेक्शन देऊन त्याप्रमाणे स्केल देणे आवश्यक आहे. अशा शिक्षकांची संख्या फार मोठी नाही. त्यामुळे अशा शिक्षकांवरील अन्याय माननीय मंत्री महोदयांनी दूर करावा, ही विनंती.

-----

.2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते व श्री.दिलीपराव सोनवणे यांनी अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने शिक्षकेत्तर कर्मचा-यांना शिक्षकाची अर्हता प्राप्त केल्यानंतर शिक्षण सेवक पदावर नियुक्त झाल्यानंतर वेतनास संरक्षण मिळत नाही, याबाबतीत पोटतिडकीने विषय मांडला. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते हे शिक्षकांसाठी या सभागृहामध्ये सातत्याने आवाज उठवतात. ते शिक्षकांना सातत्याने न्याय देण्याचा प्रयत्न करीत असतात. सभापती महोदय, आपल्याला आठवत असेल की, आपण ज्यावेळी पाचवा वेतन आयोग या राज्यामध्ये लागू केला तेव्हा जवळपास 10 हजार कोटी रुपयांचा बोजा पडला. सत्तारुढ लोकशाही आघाडीचे शासन सत्तेवर आल्यानंतर शासनाने सगळयाच खात्यांचा आढावा घेण्याचे धोरण ठरविले. त्यानुसार खरोखरच ज्याठिकाणी पदांची आवश्यकता असेल तीच पदे ठेवायची असे ठरले. उर्वरित पदे अतिरिक्त करुन ती वर्ग करण्याचे ठरले. त्यावेळी नोकर भरती करावयाची नाही, असे ठरले होते. परंतु शिक्षण ही अव्याहत चालणारी प्रक्रिया असल्यामुळे शिक्षक हे नियुक्त करणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शिक्षण सेवकाची कंत्राटी पध्दती पुढे आली. या माध्यमातून जवळपास 24 हजार शिक्षकांचा आर्थिक भार उचलावा लागणार आहे. त्याठिकाणी अनेक संघटना कोर्टामध्ये गेल्या. ज्याचा उल्लेख मघाशी माननीय मोते साहेबांनी केला. ज्यावेळी अशा प्रकारचे ॲफेडेव्हीट न्यायालयामध्ये सादर करण्यात आले, त्यावेळी न्यायालयाने या कंत्राटी पध्दतीला मान्यता दिली. त्यानंतर या नव्या अर्थाने शिक्षण क्षेत्रामध्ये शिक्षण सेवक ही पध्दत सुरु करण्यात आली. त्यामध्ये शिपाई, कनिष्ठ लिपिक किंवा वरिष्ठ लिपिक असतील, त्यांनी आपली बी.ए.,बी.एड.,एम.ए.,बी.एड, अशी शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेली असते. अशा शिक्षकांनी 10-12 वर्षे सेवा करुनसुध्दा त्यांना पुन्हा नव्याने शिक्षण सेवक म्हणून कमी पगारावर काम करावे लागते, त्यामध्ये त्यांचे फार मोठे नुकसान होते. याबाबतीत आपल्याला सरसकट अशा प्रकारचा काही निर्णय घेता येणार नाही.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ.......

प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये कंत्राटी पध्दतीने नेमणूक झालेल्या कर्मचा-यांना वेतनश्रेणी देण्याबाबत वित्त विभागाशी चर्चा करुन केस-टू-केस निर्णय घेण्यात येईल, असा विश्वास या ठिकाणी देतो.

**तालिका सभापती (श्री.विलास अवचट)** : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

---------------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी.** : राज्यातील परिवहन विभागातील वाहन नोंदणीतील भ्रष्टाचार

**मु. शी.** :राज्यातील परिवहन विभागातील वाहन नोंदणीतील भ्रष्टाचार या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 17382 ला दिनांक 5 जुलै 2006 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.विनोद तावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, "राज्यातील परिवहन विभागातील वाहन नोंदणीतील भ्रष्टाचार" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 17382 ला दिनांक 5 जुलै, 2006 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, परिवहन विभागातील नवीन मोटार वाहनांसंबंधी करण्यात येणा-या नोंदणीबाबत मी सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी जे उत्तर देण्यात आले होते ते असमाधानकारक असल्यामुळे मी आज ही अर्धातास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये मोटार वाहनाची नोंदणी करण्यासाठी संगणकाची मदत घेण्यात येते व त्या कार्यालयाचे संगणकीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. संपूर्ण संगणकीय यंत्रणेमार्फत काम चालत असतांना सुध्दा डुप्लिकेट चॅसिस आणि इंजिन क्रमांक दिल्याचे आढळून आले आहे. परवा मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाले किंवा 12 मार्च 1993 रोजी मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाले त्यामध्ये जी वाहने वापरण्यात आली होती त्या वाहनांच्या चॅसिस व इंजिन क्रमांकावरुन ती गाडी कोणाच्या मालकीची आहे हे शोधून पोलीस गुन्हेगारांचा माग काढत माहिम कपडा बाजारापर्यन्त पोहोचले. म्हणजेच चॅसिस व इंजिन क्रमांक हे फार महत्वाचे असतात. आता परिस्थिती अशी आहे की, एकच गाडी, एकच चॅसिस व इंजिन क्रमांक दोन तीन मालकांच्या नावाने दाखविला गेला आहे. कोणत्याही वाहनाचा नंबर प्लेट बदलला तरी चॅसिस नंबरवरुन वाहनाचा खरा मालक ओळखता येतो आणि त्यादृष्टीने गुन्हयांचा तपास होत असतो. अशा प्रकारची 700 ते 800 प्रकरणे आतापर्यन्त उधडकीस आलेली आहेत. ज्यावेळी मी हा प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता त्यावेळी जे उत्तर सन्माननीय मुख्यमंत्री व त्यांच्या मंत्रालयाने दिले होते ते असे होते की, "प्रथमदर्शनी चौकशी अहवालानुसार वाहनाचे वितरक आणि मालक यांच्या

SRR/ SBT/ MHM/

श्री.विनोद तावडे...........

संगनमताने एकाच वाहनाची नोंद केली अशा लोकांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत." सभापती महोदय, आता परिवहन कार्यालयांमध्ये संगणकीकरण झालेले आहे. एखाद्या वाहनाला चॅसिस नंबर दिल्यानंतर उर्वरित आकडेवारी संगणकाकडून मिळाली पाहिजे. जर ते होत नसेल तर सॉफ्टवेअरमध्ये काही तरी गडबड असावी. परंतु, मला हे लक्षात आणून द्यावयाचे आहे की, ही गडबड सॉफ्टवेअरची नसून परिवहन कार्यालयातील अधिका-यांमार्फत हे सर्व होत आहे. परिवहन कार्यालय कोण चालवितो, किती एजंट त्या ठिकाणी असतात, याचा ऊहापोह मी या ठिकाणी करणार नाही. परंतु, परिवहन कार्यालयातील अधिका-यांनी संगनमत करुन एकच चॅसिस नंबर 2/2, 3/3 वाहनांना दिलेला आहे. जे गुन्हेगार लोक असतात त्यांना अशा प्रकारच्या चॅसिस नंबरची गरज असते. त्याचप्रमाणे यामागे बँकेचा आर्थिक घोटाळाही आहे. एकाच चॅसिस नंबरवरुन 2/2, 3/3 लोकांना कर्ज देणे आणि मग कर्ज परतफेड होत नाही म्हणून वाहन जप्त करावयाचे असते. परंतु, प्रत्यक्षात वाहन नसल्यामुळे कर्जफेडही होत नाही आणि वाहनही मिळत नाही. अशा परिस्थितीमध्ये बँकांचे नुकसान होते. अशा प्रकारे हा बँकेतील आर्थिक घोटाळा आहे व त्यासाठी देखील परिवहन कार्यालयाचा उपयोग होत आहे. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, केवळ प्रादेशिक परिवहन खात्यातील काही चूक, सॉफ्टवेअरमध्ये गडबड एवढा मर्यादित विचार न करता गुन्हेगारी टोळयांशी आपल्या खात्यातील अधिका-यांचा संबंध जुळलेला आहे, अशा पध्दतीने विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ........

दुसरा प्रश्न असा आहे की, बँकेतील आर्थिक घोटाळयांशी जोडलेली ही लिंक आहे. चर्मोद्योग घोळयासारखा हा घोटाळा आहे. या प्रकरणाची केवळ विभागामार्फत चौकशी करुन चालणार नाही. माननीय मंत्री महोदयांनी हे प्रकरण गुन्हे अन्वेशन विभागाकडे हे सोपवावे. याची पाळे मुळे खणून काढली तर आपल्या असे लक्षात येईल की, या केवळ चुका नाहीत. हे मोठे छडयंत्र चालले आहे. सामान्य माणसे बँकेमध्ये पैसे ठेवतात. ते पैसे लुटणारी टोळी यातून बाहेर येणार आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन हे प्रकरण सी.बी.आय.कडे सोपवावे, अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, आम्हाला ज्या त्रुटी आढळून आल्या त्याची माहिती उत्तरामध्ये दिलेली आहे. एकाच इंजिनचे आणि चॅसिस नंबरचे दोन वेळा रजिस्ट्रेशन झालेले आहे. या प्रकरणाची ट्रान्सपोर्ट कमिशनर मार्फत चौकशी करण्यात येईल. मी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना असे सांगू इच्छितो की, बँकेचे व्यवहार झाले असतील किंवा इतर जे व्यवहार झाले असतील त्या व्यवहारांची ट्रान्सपोर्ट कमिशनर मार्फत चौकशी केली जाईल. मला असे वाटते की, ट्रान्सपोर्ट कमिशनर यांच्यामार्फत चौकशी केली तर चांगला न्याय मिळेल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यामध्ये काय घडलेले आहे याची ट्रान्सपोर्ट कमिशनर मार्फत चौकशी होऊ शकते. बँकेतील घोटाळयाची चौकशी करण्यासाठी ट्रान्सपोर्ट कमिशनरला कोणी दाद देणार नाही. सॉफ्टवेअरमध्ये काय गडबड झालेली आहे याची चौकशी ट्रान्सपोर्ट कमिशनरला करता येईल. समजा सन्माननीय सदस्य श्री.अवचट साहेबांनी आणि मी गाडी घेतली आणि आम्हाला ट्रान्सपोर्ट कमिशनरने चौकशीसाठी बोलाविले तर आम्ही त्यांच्याकडे चौकशीसाठी जाऊ. माननीय मंत्री महोदयांना माझी अशी विनंती आहे की, हे प्रकरण सी.आय.डी.कडे सोपविले तर यातील भानगडी बाहेर येतील. हे प्रकरण गंभीर आहे. एकच चॅसिस नंबर दोन-तीन गाडयांना देण्यात येतो. स्मगलिंगमध्ये गाडयांचा वापर केला जात असतो. एखाद्या प्रकरणामध्ये आम्ही आपल्याला असा प्रश्न विचारु की, आपण कोणाला तरी पाठीशी घालण्यासाठी थातुरमातूर चौकशी करीत आहात काय ? हे प्रकरण गंभीर आहे. माननीय मंत्री महोदयांना हे प्रकरण सी.आय.डी. कडे सोपविण्यास काय हरकत आहे.

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, नागपूर विभागामध्ये जी 32 प्रकरणे या संदर्भात आपल्या हातामध्ये आली होती त्यापैकी 26 प्रकरणांमध्ये चौकशी पूर्ण झाली असून त्यातील 6 प्रकरणांमध्ये चुकीचे म्हणजे डबल रजिस्ट्रेशन झालेले आहे असे दिसून आले आणि त्यामुळे त्या प्रकरणांमध्ये त्याबाबतचे गुन्हे दाखल झालेले आहेत व त्याबाबत पोलीस कार्यवाही सुरू आहे. परंतु सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे यामध्ये संपूर्ण चौकशी होण्याची देखील गरज आहे त्यामुळे आपण या बाबतीत ए.सी.बी.कडून चौकशी करू.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, भ्रष्टाचार प्रतिबंधक खात्यामार्फत अशा गंभीर प्रकरणांची चौकशी करण्याऐवजी आपल्या पोलीस विभागातील आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग आहे त्याच्याकडून किंवा सन्माननीय सदस्य श्री.तावडे यांनी सांगितल्याप्रमाणे सीआयडी मार्फत चौकशी केली गेली तर वाहन नोंदणीमध्ये जे भयानक घोटाळे झाले आहेत वा होत आहेत ते थांबतील आणि या विभागाला एक शिस्त लागेल असे मला सुचवावयाचे आहे. तरी आपण त्याप्रमाणे कारवाई करणार आहात काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.तावडे आणि प्रा.कवाडे यांनी सांगितल्याप्रमाणे या प्रकरणांची चौकशी सीआयडी मार्फत केली जाईल.

**तालिका सभापती** : अर्धा तास चर्चा संपली आहे.

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.गुरूनाथ कुलकर्णी )**

****

...... यू 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यातील जात पडताळणी केंद्रामध्ये मागासवर्गीयांचे जात पडताळणी अर्ज एक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत.

**मु.शी.** : राज्यातील जात पडताळणी केंद्रामध्ये मागासवर्गीयांचे जात पडताळणी अर्ज एक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत या विषयावरील ता.प्र.क्र.18911 ला दिनांक 4 जुलै 2006 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात प्रा.शरद पाटील,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

----

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, "राज्यातील जात पडताळणी केंद्रामध्ये मागासवर्गीयांचे जात पडताळणी अर्ज एक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत " या विषयावरील ता.प्र.क्र. ता.प्र.क्र.18911 ला दिनांक 4 जुलै 2006 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, "राज्यातील जात पडताळणी केंद्रामध्ये मागासवर्गीयांचे जात पडताळणी अर्ज एक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत " या विषयावरील ता.प्र.क्रमांक 18911 काही सन्माननीय सदस्यांनी याच अधिवेशनामध्ये सदनामध्ये उपस्थित केला होता. त्याला उत्तर देत असताना माननीय मंत्री महोदयांनी मे, 2006 अखेर राज्यातील सहाही विभागांतील जात पडताळणी कार्यालयांमध्ये एकंदर 48266 प्रकरणे प्रलंबित असल्याचे सांगितले होते. ही जात पडताळणी त्वरित व्हावी यासाठी शासन दर तिमाहीला एक आढावा बैठक घेत असते आणि त्यामध्ये या सगळ्या सहाही विभागांतील कामांचा निपटारा व्हावा म्हणून प्रयत्न केले जातात. त्याचप्रमाणे 31 मे 2006 रोजी या जात पडताळणी कार्यालयांसाठी विभागीय समाजकल्याण अधिकारी अशी नवीन 6 पदे निर्माण केलेली आहेत असेही मंत्र्यांनी सांगितले होते. सभापती महोदय, ही अर्धा तास चर्चा येथे उपस्थित करण्यामागील माझा मुख्य उद्देश असा आहे की, निरनिराळ्या शिक्षण संस्था तसेच शासनाची निरनिराळी आस्थापने यांनी आपल्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांची किंवा संभाव्य कर्मचाऱ्यांची जातीची प्रमाणपत्रे जात पडताळणीसाठी म्हणून विभागीय समाजकल्याण अधिकारी यांचेकडे पाठविलेली असतात आणि वर्षानुवर्षे त्या प्रमाणपत्रांची पडताळणी होत नाही असा सर्वसाधारण अनुभव आहे. ही जात पडताळणी होण्यामध्ये विलंब होतो, दिरंगाई होते त्यामागे दोन

...... यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील ....

कारणे आहेत. एक म्हणजे त्या कार्यालयांमध्ये असलेला अपुरा कर्मचारीवृंद आणि दुसरे कारण म्हणजे तेथे यासाठी होणारा भ्रष्टाचार. विभागीय समाजकल्याण अधिकाऱ्यांकडे यासाठी जो कर्मचारीवृंद असतो तो अत्यंत अपुरा असतो शिवाय त्यांच्याकडे जातपडताळणी खेरीज इतरही कामे सोपविलेली असतात त्यामुळे निरनिराळ्या आस्थापनांकडून जात पडताळणीसाठी आलेल्या प्रस्तावांची पडताळणी करण्यामध्ये त्यांना विलंब लागतो. सभापती महोदय, आपण यासाठी एक अधिकारी नेमल्यानंतर त्याच्या हाताखाली पुरेसा कर्मचारीवर्ग नसेल तर त्याच्याकडील कामाचा निपटारा होणार नाही म्हणून मी या निमित्ताने शासनाला सूचना करू इच्छितो की, या जात पडताळणी कार्यालयांमध्ये कमी असलेला कर्मचारीवृंद तात्काळ भरण्यात यावा आणि त्यांच्याकडे केवळ जातपडताळणीचेच काम सोपविण्यात यावे.

सभापती महोदय, वर्षानुवर्षे जात पडताळणीचे अर्ज या कार्यालयांमध्ये पडून राहतात त्यामागे भ्रष्टाचार हेही एक कारण आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, पोलीस महासंचालकांनी शिपाई पदाच्या भरतीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच इतर मागासवर्गीय संवर्गातील कर्मचारी भरले पण त्यांच्या जातीची प्रमाणपत्रांची पडताळणी होण्याचे काम 7-8 वर्षे झाली तरीही पूर्ण झालेले नाही, अजून देखील त्याबाबतचा निकाल कळविण्यात आलेला नाही असे अनेक पोलीस कर्मचाऱ्यांनी आम्हाला सांगितले आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... व्ही 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील...

शिक्षण संस्थांमधून त्यांच्या कर्मचाऱ्यांचे जातपडताळणीचे प्रस्ताव पाठविले जातात, ते प्रस्ताव वर्षानुवर्षे निकाली काढले जात नाहीत. यासंदर्भात मी आपल्याला एका शिक्षण संस्थेचा दाखला देतो. कोल्हापूर जिल्हयातील जयसिंगपूर येथे झेले हायस्कूल आहे. त्यामधील 5 कर्मचाऱ्यांचे जातपडताळणीचे प्रस्ताव 27.3.2004 ला पाठविण्यात आले. आता 2006 साल सुरु असून त्यापैकी 4 कर्मचाऱ्यांच्या जातपडताळणी संबंधीचा निकाल लागलेला नाही. अशातऱ्हेने वर्षानुवर्षे ही प्रकरणे रेंगाळत पडलेली असतात. संबंधित कर्मचारी त्या कार्यालयामध्ये जाऊन पैसे देऊन आपली प्रकरणे शोधून काढून जातपडताळणी करुन घेतात. तसेच, त्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी सांगतात की, तुमच्या कर्मचाऱ्यांची जातपडताळणी करावयाची असेल तर तुमचे कर्मचारी याठिकाणी पाठवा, त्यांना चार दिवस कामाला बसवा, त्यानंतर ते जातपडताळणीचे काम करुन जाऊ दे. अशाप्रकारच्या सूचना केल्या जातात. यामधील अशाप्रकारचा गोंधळ नाहिसा व्हावयाचा असेल तर जातपडताळणी कार्यालयामध्ये आवश्यक तेवढे कर्मचारी भरले पाहिजेत. त्यांच्याकडे इतर कामे न सोपविता एकच काम सोपविण्यात यावे.शक्य झाल्यास प्रत्येक जिल्हयामधील समाज कल्याण कार्यालयामध्ये जातपडताळणी केंद्र सुरु करण्यासंबंधी देखील विचार करावा अशी मागणी करतो. आणि जास्तीत जास्त तीन महिन्याच्या आत ही जातपडताळणी व्हावी अशाप्रकारचे आदेश शासनाने सर्व विभागीय कार्यालयांना द्यावेत अशी मागणी करुन माझे भाषण संपवितो. जयहिंद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, आमच्या विभागाच्या माध्यमातून मार्च महिन्यामध्ये जातपडताळणीचे जवळ जवळ 1 लाख 20 हजार अर्ज प्रलंबित होते. आणि आजची स्थिती पाहिली तर जवळ जवळ 34 हजार 332 प्रकरणे अजून प्रलंबित आहेत. यामध्ये शैक्षणिक विषयक, निवडणूकविषयक, शासकीय सेवा विषयक अशा चार प्रकारच्या कॅटॅगरीमधील अर्ज प्रलंबित आहेत. ही प्रकरणे निकालात काढण्यासाठी आपण 24 नवीन पदे मंजूर केली असून ती सर्व भरण्यात आली आहेत. त्यामुळे या कार्यालयाला कर्मचाऱ्यांची कोणतीही अडचण नाही. तसेच, या कार्यालयाला 17 जुलैपासून एक टाईम बाऊंड कार्यक्रम तयार करुन देण्यात आला असून त्यांनी दर महिन्याला त्यांच्या केसेस काढल्या पाहिजेत. आणि कमीत कमी तीन महिन्याच्या आत या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जवळ जवळ 7 ते 8 हजार केसेस निकालात काढल्या पाहिजेत अशाप्रकारच्या सूचना देण्यात आल्या आहेत. माननीय सदस्यांनी अशाप्रकारची व्यवस्था जिल्हा स्तरावर देखील करण्यात यावी अशी सूचना केली आहे. प्रत्येक जिल्हयामध्ये दक्षता समिती जाईल आणि त्याठिकाणी हियरींग घेईल. त्याठिकाणी बाहेरच्या लोकांनी येण्यापेक्षा जिल्हयातील लोक हियरींग घेतील व त्यांच्यामार्फत कागदपत्रांची तपासणी केली जाईल. या समितीला जर 1950 सालची कागदपत्रे तपासण्यासाठी हवी असतील व ती त्यांना ताबडतोब उपलब्ध करुन दिली तर ते प्रकरण व्हेरिफाय करुन लवकर निकालात काढता येईल. यामध्ये मुख्य अडचण अशी आहे की, कागदपत्रे उपलब्ध होत नसल्यामुळे विलंब होतो. नियम असा आहे की, 3 महिन्यामध्ये जातपडताळणी झाली पाहिजे, आपण ही मुदत 6 महिन्यांची केली आहे. तरीसुध्दा जर त्यांना कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाही तर तात्काळ निर्णय घेता येत नाही. म्हणून सर्व अर्जदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सर्व कागदपत्रांसहीत अपिल केल्यास लवकर निर्णय घेण्यामध्ये अडचण येणार नाही. सभापती महोदय, 34 हजार 332 प्रकरणांचा निकाल तीन महिन्याच्या आत आपल्याला लावावयाचा आहे. त्यामुळे तीन महिन्याच्या आत निर्णय घेण्यासंबंधी सर्व विभागीय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे सुप्रिम कोर्टाच्या गाईडलाईन्सप्रमाणे डेप्युटी कमिशनर हे त्याबोर्डाचे चेअरमन असतात.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम (पुढे सुरु..

सुप्रीम कोर्टाच्या गाईडलाईन्सप्रमाणे डेप्युटी कमिशनर हे बोर्डाचे चेअरमन होऊ शकतात. परंतु त्यांच्याकडे त्यांच्या ऑफीसचे काम सांभाळून हे अधिकचे काम करावे लागते. म्हणून स्वतंत्र सह संचालक रँकचे अधिकारी चेअरमन म्हणून नेमले तर या कामाला गती येऊ शकेल, त्यांना स्वतंत्ररित्या काम करता येईल. आज जात पडताळणीचे काम डेप्युटी कमिशनरांकडे असल्यामुळे त्यांना त्यांचे काम सांभाळून हे काम करावे लागते. तरी देखील त्यांना सूचना दिलेल्या आहेत की, जात पडताळणीचे काम ताबडतोबीने झाले पाहिजे. आपण या संदर्भाने नवीन कायदा केलेला आहे की, जोपर्यन्त व्हॅलिडेटी सर्टिफिकेट मिळणार नाही, तोपर्यन्त निवडणुकीमध्ये उमेदवारांना उभे रहाता येणार नाही. जात पडताळणीच्या कामाला गती देण्याचे काम राज्य सरकारच्या माध्यमातून केले जात आहे. एवढेच मी या चर्चेच्या माध्यमातून सांगू इच्छितो.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या विषयावर या ठिकाणी चर्चा होत आहे. खरे म्हणजे जात पडताळणीच्या कामाच्या संदर्भात शासनाला पूर्ण कल्पना आहे. या संबंधाने शासन स्तरावर सातत्याने हजारो तक्रारी येत असतात. आता माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, यापूर्वीच्या नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये उमेदवारांची जात पडताळणी झालेली आहे, अशांना निवडणुकीमध्ये उभे राहात येईल. मागच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये जे निवडून आलेले उमेदवार होते, त्यांची कागदपत्रे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत जातपडताळी समितीकडे पाठविण्यात आली. अजूनही त्यांची जातपडताळणी झालेली नाही. हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. मी मंत्री महोदयांना विनंती करेन की, जात पडताळणी समितीला वेळेचे बंधन घातले पाहिजे. कागदपत्र दाखल केल्यानंतर दोन महिन्यामध्ये जात पडताळणी करुन दिली गेली पाहिजे. आता नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये वॉर्डची रचना झाल्यानंतरच उमेदवार ठरतो. कोण उमेदवार निवडून येईल, हे वॉर्डच्या रचनेनंतरच निश्चित होते. काही लोक निवडून येणाऱ्या उमेदवाराचे जात पडताळणी सर्टिफिकेट लवकर यायला नको, म्हणून फिल्डींग लावतील. तेथे काहीही चालते. म्हणून माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे. सख्या भावाला सर्टिफिकेट मिळते आणि त्याच्या दुसऱ्या भावाला ते नाकारले जाते. अशाप्रकारच्या असंख्य केसेस आहेत. शेवटी उच्च न्यायालयाने न्याय द्यावा, म्हणून प्रत्येक माणूस कोर्टामध्ये जाऊ शकत नाही. या संबंधात असंख्य तक्रारी आहेत. खास करुन नासिक विभागाच्या जात पडताळणी समितीच्या विरोधामध्ये तक्रारी आहेत. वेळोवेळी शासनाने निर्देश देऊन देखील काही होत नाही. अगोदर आपली ही



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी (पुढे सुरु....

यंत्रणा सक्षम केली पाहिजे आणि नंतर लोकांना याबाबतची बंधने घातली पाहिजेत. जात पडताळणी समितीला तीन महिन्यामध्ये व्हॅलिडीटी सर्टिफिकेट देण्याच्या संबंधात कालमर्यादा घालून देणार आहात काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : आपण तसा कायदाच केलेला आहे की, तीन महिन्यात याबाबतचा निर्णय दिला पाहिजे.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : त्या मुदतीमध्ये ते व्हॅलिडिटी सर्टिफिकेट देत नाहीत.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : एकूण 34,232 अर्ज प्रलंबित आहेत. तीन महिन्यामध्ये प्रकरण निकालात काढण्याबाबतचे डायरेक्शन आहेत. सगळी कागदपत्रे असतील तर ते प्रकरण तीन महिन्यात निकाली निघेल. संबंधितांनी कागदपत्रे दिली नाहीत तर ती प्रकरणे परत पाठवावी लागतील. या संदर्भातील सगळी कागदपत्रे जोडणे ही संबंधितांची जबाबदारी आहे.

डॉ.एम.ओ.अझिज : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद पाटील साहेबांनी अर्धा-तास चर्चेद्वारे महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ही अत्यंत कठीण बाब झालेली आहे. विद्यार्थ्यांना ॲडमिशन घ्यावयाचे असेल तर जात पडताळणी सर्टिफिकेट वेळेवर मिळत नाही. मग मेडिकल कॉलेज, इंजिनिरींग कॉलेजला प्रवेश घ्यायचा असो. वेळेवर सर्टिफिकेट उपलब्ध न झाल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश घेता आलेला नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, विद्यार्थ्यांच्या जात पडताळीसाठी स्वतंत्र अशाप्रकारचा सेल निर्माण करावा, म्हणजे विद्यार्थ्यांना वेळेवर जात पडताळणी प्रमाणपत्र मिळेल. तशाप्रकारचा सेल आपण निर्माण करणार आहात काय ?

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्री. गुरुनाथ कुलकर्णी ) : या प्रश्नाला जोडून सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे प्रश्न विचारतील व त्यानंतर दोन्ही प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्रिमहोदय देतील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, तीन महिन्यांचा नियम आहे. मुळात हे प्रमाणपत्र देणारी ॲथॉरिटी ही क्वासी ज्युडिशियल ॲथॉरिटी असते. ज्यावेळी जेन्युईन प्रकरण घेऊन माननीय मंत्रिमहोदयांकडे गेलो तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांनी फोन केला. त्यानंतर मी त्यांना भेटलो असता त्यांनी असे सांगितले की, आम्हाला मंत्रिमहोदयांची शिफारस किंवा आग्रह चालत नाही. आमचे जे नियम आहेत त्याप्रमाणेच आम्ही काम करणार असे त्यांनी सांगितले. जे राजपूत भामटा समाजातील लोक आहेत त्यांना दुनियाभराची प्रोसीजर करावी लागते. यामध्ये तीन महिने मुदत असून काही होत नाही. आपण कायद्यामध्ये दुरुस्ती केली तरच हे होऊ शकते. नाही तर आम्ही हे काम गतिमान करु वगैरे म्हणून काही होणार नाही. शासनाला जेन्युअनली हा प्रश्न सोडवावयाचा असेल तर त्यासंदर्भात कायद्यामध्ये शासन दुरुस्ती करणार काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, 24 पदे नवीन निर्माण केली. यापूर्वी आपल्याकडे कर्मचारीवर्ग कमी होता त्यामुळे कामाची गती कमी होती. मार्चपर्यंत 1 लाख 20 हजार अर्ज आले होते. त्यापैकी 80 हजार अर्ज निकाली काढले. 34 हजार अर्ज शिल्लक आहेत. आपल्याकडे आता व्यवस्थित कर्मचारीवर्ग आहे. नवीन सेल करण्याची आवश्यकता नाही. कायद्यामध्ये तरतूद आहे त्याप्रमाणे काम केले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी विद्यार्थ्यांच्या बाबतीत सांगितले. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आपण प्रोव्हीजनल दाखला देतो.

श्री. दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी अतिशय महत्वाच्या प्रश्नावर या ठिकाणी अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी देखील त्यासंदर्भातील उपाययोजना सांगितलेली आहे. परंतु जात पडताळणी केंद्रावर अतिशय वाईट अनुभव येतात आणि त्यासंदर्भात लोकांची पिळवणूक होते. विशेषत: विद्यार्थी, कर्मचारी, पालक यांना पुन्हा पुन्हा त्या ठिकाणी खेपा घालण्यास भाग पाडतात. नाशिक विभागामध्ये जात पडताळणीची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे .....

लोकांना बोलविले जाते परंतु कोणत्याही प्रकारची माहिती देत नाहीत. त्या ठिकाणी फार मोठा सावळागोंधळ होतो. पैशाची देखील मागणी होते. त्या ठिकाणी एजंट देखील असतात. अशा पध्दतीने नाशिक विभागामध्ये जे अधिकारी बसलेले आहेत त्यामध्ये श्री. पटोले नावाचे जे अधिकारी आहेत त्यांची कोणत्याही प्रकारचे काम करण्याची दानत नाही. ते काम करीत नाहीत. त्यामुळे त्या भ्रष्टाचाराचा लोकांना त्रास होतो. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आहे. त्या ठिकाणी अशी जी प्रलंबित प्रकरणे आहेत त्यासंदर्भात त्या कार्यालयाकडून त्रासदायक भूमिका घेतली जाते. याची सखोल चौकशी करुन संबंधितांना न्याय मिळाला पाहिजे. श्री. एस.ए.पाचपोळ, गृह विभाग, यांचे प्रकरण दोन वर्षापासून पडलेले आहे. अशी किती तरी प्रकरणे सांगता येतील. त्या ठिकाणी लोकांना त्रास होणार नाही, लोकांची पिळवणूक होणार नाही याची काळजी घेण्यासाठी नाशिक विभागामध्ये यंत्रणा उभी करणार काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, त्या ठिकाणी जे अधिकारी व कर्मचारी आहेत त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी श्री. पटोले नावाच्या अधिकाऱ्याबाबत सांगितले. ते तशा प्रकारचा भ्रष्टाचार करीत असतील, गडबड घोटाळा करीत असतील तर त्यांची ताबडतोब बदली करु आणि त्या ठिकाणी दुसरा अधिकारी नेमण्यात येईल.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : जो भ्रष्टाचारी आहे त्याच्यावर काय कारवाई करणार आहात ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सन्माननीय सदस्यानी पाटोळे नावाचा अधिकारी भ्रष्टाचारी आहे असे सांगितले. त्या अधिका-याची बदली करु आणि तेथे नवीन अधिकारी नेमू.

श्री. विलासराव शिंदे : एक म्हणजे एकाच वेळी त्रुटींची पूर्तता करण्यास सांगितले जात नाही. दुसरे असे की, त्या कार्यालयामध्ये गेल्यानंतर कागदपत्रे सापडत नाहीत असे सांगितले जाते आणि त्या कार्यालयाला गेल्या शिवाय दाखलाच मिळत नाही अशी वस्तुस्थिती आहे. याबाबतीत कोणती कारवाई केली जाईल ? पैसे दिल्या शिवाय दाखला मिळत नाही आणि ही पध्दत सर्व कार्यालयातून चालू आहे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : जो कोणी अधिकारी वा कर्मचारी पैसे घेत असेल तर त्याबाबतीत आम्हाला सूचना करावी. आम्ही ॲण्टी करप्शन ब्युरोकडून त्याला पकडून देऊ.

श्री. जयंत प्र. पाटील : अधिका-याने तीन महिन्यामध्ये दाखला दिला नाही तर त्याच्यावर कोणती कारवाई करणार आहात ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : मी सुरुवातीलाच सांगितलेले आहे की, नियमानुसार 3 महिन्यामध्ये दाखला दिला पाहिजे. परंतु त्याबाबतीत आपण मुदतवाढ दिलेली असून तो कालावधी 6 महिन्याचा केलेला आहे. दाखल मिळण्याच्या संदर्भातील सर्व कागदपत्रांची पूर्तता व्हावयास पाहिजे. फॉर्म नीट भरलेला असेल तरच त्याबाबतीत पुढील कार्यवाही होऊ शकते. यासंबंधात आपण कडक कायदा केलेला आहे. याबाबतीत कोणी चूक केली तर त्याला 10 हजार रु.दंड आणि 6 महिन्याची शिक्षा होऊ शकते.

श्री. रामनाथ मोते : शासनाने 31 जानेवारी 2006ला एक परिपत्रक काढले असून त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, संबंधित प्रस्ताव कार्यालयाकडे आल्यापासून 45 दिवसाच्या आत ते निकाली काढले पाहिजेत. उदा. 15 सप्टेंबरला प्रस्ताव दिल्यानंतर तो 31 ऑक्टोबर पर्यन्त निकाली काढला पाहिजे. तो जर निकाली काढला नाही तर संबंधितावर कोणती कारवाई केली जाणार आहे ? तसेच या प्रस्तावांचे रजिस्टर त्या त्या कार्यालयामधून ठेवलेले आहेत काय ? अनुभव असा आहे की, 790 क्रमांकाचा प्रस्ताव आधी निकाली निघतो आणि 110 क्रमांकाचा प्रस्ताव प्रलंबित राहातो. प्रस्तावांच्या क्रमवारीनुसार ते निकाली काढण्याबाबत संबंधिताना आदेश देण्यात येतील काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम : 1 लाख 20 हजार अर्ज आले होते. त्या पैकी 80 हजार अर्ज निकाली काढलेले आहेत. 34 हजार अर्ज निकाली काढावयाचे आहेत. तीन महिन्यामध्ये म्हणजे 30 स्पटेंबर पर्यन्त हे अर्ज निकाली काढावेत असे आदेश सहाही विभागांना दिलेले आहेत.

श्री. भास्कर जाधव : या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी कागदपत्रांची पूर्तता करण्यासंबंधातील अडचणी मांडल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये यापूर्वी जिल्हा परिषदेचा अध्यक्ष किंवा नगरपालिकेचा नगराध्यक्ष ही पदे जर आरक्षित वर्गासाठी असतील तर त्या पदावर आरक्षित वॉर्डातून निवडून आलेल्या उमेदवाराची निवड होत होती. परंतु आता संपूर्ण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कोणत्याही वॉर्डातून उमेदवार निवडून आला तरी त्याला जिल्हा परिषदेचा अध्यक्ष किंवा नगरपालिकेचा नगराध्यक्ष होता येते.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.........

त्या विशिष्ट वॉर्डातून त्याच कॅटगरीचा माणूस निवडून येण्याची आवश्यकता नाही. अशा वेळेला एखादा माणूस ओपन कॅटगरीतून निवडून आला आणि तो ओपन कॅटगरीमध्ये उभा राहिला असल्यामुळे त्याला जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता नाही. मग जात पडताळणी प्रमाणपत्र नसेल तर तो नगराध्यक्ष किंवा जिल्हा परिषद अध्यक्ष होईल का?

**तालिका सभापती** : हा प्रश्न वेगळा आहे. जात पडताळणी प्रमाणपत्र वेळेवर उपलब्ध कसे होईल एवढेच मंत्रीमहोदयांचे काम आहे.

श्री.भास्कर जाधव : मंत्रीमहोदयांनी 1.20 लाख अर्ज आल्याचे व त्यापैकी 80 हजार अर्ज निकाली काढल्याचे सांगितले. या 80 हजारापैकी किती अर्ज वैध ठरले व किती अर्ज अवैध ठरले?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, माझ्याकडे 63,887 अर्जासंबंधीची माहिती उपलब्ध आहे त्या आधारे मी उत्तर देतो. बाकीची माहिती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे. एकूण 63,887 प्रकरणे आलेली आहेत. त्यापैकी 29,209 प्रकरणे वैध ठरली आहेत. अवैध प्रकरणे 255 असून 34 हजार प्रकरणे अनिर्णित आहेत. मागील 6 महिन्यात आलेली प्रकरणे 26,000 आहेत. 1 वर्षापासून प्रलंबित असलेली प्रकरणे 7000 आहेत व 2 वर्षाखालील प्रकरणे 1119 आहेत.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, भटक्या विमुक्त जातीच्या मुलांना त्यांच्या वडिलांच्या शाळेचा दाखला आणण्याची अट आहे. ते भटके आहेत. एका गावातून दुसऱ्या गावात सतत फिरत असतात. त्यांच्याकडे जन्माचा पुरावा उपलब्ध नाही. अशा भटक्या विमुक्त जातीच्या मुलांना जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यासंबंधी काय भूमिका असणार आहे? एखादी सामाजिक संघटना असेल किंवा बेलदारांची संघटना असेल, त्यांनी हा माणूस आमच्या बेलदार जमातीचा आहे असे लेखी लिहून दिले तर ते प्रमाणपत्र ग्राह्य धरण्याविषयी सूचना देणार आहात काय?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : व्हॅलिडिटी घेत असताना 1950 चा दाखला लागतो, हा नियम आहे. विमुक्त जाती, भटक्या जमातींचा समावेश 1966 साली व्हीजेएनटीमध्ये केला गेला. बंजारा किंवा इतर जमाती असतील त्यांचा समावेश ज्यावेळी केला गेला त्या वर्षाचा पुरावा मागितला जातो. एस.सी.,एस.टी.च्या प्रवर्गासाठी 1950 चा दाखला दिल्याशिवाय व्हॅलिडिटी देत नाही हा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम...........

नियम आहे. घटनेने ते बंधनकारक आहे. सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ते वस्तुस्थितीला धरुन आहे. म्हणून यामधून कसा मार्ग काढता येईल याकरीता बैठक घेऊन निर्णय घेता येईल. त्यांना कशी सवलत देता येईल याचा जरुर विचार करु.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी आरक्षित प्रवर्गातील लोक अर्ज करतात त्यांना सहा महिन्याच्या आत प्रमाणपत्र दिले पाहिजे असे मंत्रीमहोदयांनी सांगितले. सन्माननीय सदस्य श्री.विलासराव शिंदे यांनी सांगितले की, जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यासाठी लागणारी कागदपत्रे एकाच वेळी न मागता एक कागदपत्र आणा, दुसरे कागदपत्र आणा, तिसरे कागदपत्र आणा अशी मागणी करण्याऐवजी एकाच वेळी ज्या कागदपत्रांची आवश्यकता आहे ते एक्झीबिट त्यांनी केले पाहिजे, त्याची व्यवस्था समाजकल्याण विभागामार्फत होणार का?

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे .....

अशा प्रकारच्या अनेक तक्रारी सन्माननीय सदस्यांनी केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब म्हणतात की, "लक्ष्मी दर्शन झाल्याशिवाय जातीचे प्रमाणपत्र दिले जात नाही". सभापती महोदय, जर खरे जातीचे प्रमाणपत्र घ्यावयाचे असेल आणि त्यासाठी जर पैसे द्यावे लागत असतील तर खोटे जातीचे प्रमाण पत्र पैसे देऊन मिळू शकते असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. त्यामुळे यासंदर्भात शासन काही कठोर बंधन घालणार आहे काय असा माझा प्रश्न आहे?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय,यासंदर्भात अर्जाचा फॉर्मेटच तयार करण्यात आलेला आहे. व त्या फॉर्मेट प्रमाणे अर्ज भरुन घेतला जातो व अर्ज बरोबर भरल्यानंतर जातीचे प्रमाण पत्र दिले जाते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. कवाडे साहेबांनी जातीचे प्रमाणपत्र मिळण्यामध्ये भ्रष्टाचार होतो असे सांगितलेले आहे त्यामुळे मी त्यांना सांगू इच्छितो की, जर तशा प्रकारची तक्रार आली तर त्यासंदर्भात जरुर कारवाई करण्यात येईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. शेंडगे साहेबांनी सांगितले आहे की, सदर जातीच्या संघटनेने सदर इसम हया हया जातीचा आहे असे प्रमाणपत्र दिले तर ते ग्राहय धरले जाईल का? यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, सरपंच आणि पटवा-याचा दाखला आपण ग्राह्य धरत असतो. पटवारी आणि सरपंच सक्षम अधिकारी आहेत असे समजून मान्यता दिली जाते.

**तालिका सभापती ( श्री. गुरुनाथ कुलकर्णी ) :** अर्धातास चर्चा संपलेली आहे.

--------------

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेत झालेला लाखो रुपयांच्या गैरव्यवहार

**मु. शी.** :नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेत झालेला लाखो रुपयांच्या गैरव्यवहार या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 17682 ला दिनांक 3 जुलै,2006 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेत झालेला लाखो रुपयांच्या गैरव्यवहार या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 17682 ला दिनांक 3 जुलै, 2006 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मी अर्धा तास चर्चेचा जो विषय मांडलेला आहे तो अत्यंत महत्वाचा आहे. मराठवाडयातील ग्रामीण भागातील जनतेला दिशा देणारा असा हा अर्धा तास चर्चेचा विषय आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात शासनाने आणि माननीय मंत्रीमहोदयांनी चांगल्या प्रकारे निर्णय घेऊन ग्रामीण भागातील अर्थकारणाला दिशा देण्याची गरज आहे. सभापती महोदय, नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर ते असे सांगता येईल की,

"चिंगारी कोई भडके तो सावन उसे बुझाए,
सावन ही अगन लगाए तो उसे कोन बुझाए."

सभापती महोदय, जर बँक चालविणा-या संचालकांनीच जर बँक खावयास सुरुवात केली आणि सहकार खात्याने संरक्षण देण्याचे ठरविले तर नांदेड जिल्हयातील जनतेचे भवितव्य तसेच नांदेड जिल्हयातील शेतक-यांचे भवितव्य काही चांगले नाही असेच म्हणावे लागेल.

सभापती महोदय, नांदेडमध्ये 80 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत व या बँकेच्या संदर्भात शासनाने कारवाई केली नाही तर अजून शेतक-यांच्या आत्महत्या वाढू शकतील एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. सभापती महोदय, नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचा 31 मार्च, 2006 पर्यंतचा तोटा 223.92 कोटी रुपयांचा आहे. नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे टोटल डिपॉझीट 567 कोटी रुपये आहे व या बँकेवर 443 कोटी रुपयांचे कर्ज एनपीए झालेले आहे. तर बँकेला 658

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी........

कोटी रुपयांचे कर्ज येणे बाकी आहे. या बँकेतून गरीब लोकांनी कर्ज घेतलेले आहे असे नसून या बँकेतून मोठ मोठया दिग्गज लोकांनी कर्ज घेतलेले आहे. भास्कर पाटील-खतगावकर यांच्या गोदावरी मन्यार सारखर कारखान्यासाठी 81 कोटी रुपयांचे कर्ज दिलेले आहे. एका कारखान्याचा चार्ज डीसीसी बँकेने ताब्यात घेतलेला आहे. अंबिका सहकारी साखर कारखाना, गुंटूर यांना 50 कोटीचे कर्ज या बँकेने दिलेले आहे. या कारखान्यावर दुस-या बँकेचे कर्ज असतांना सुध्दा नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेने त्यांना पुन्हा 50 कोटी रुपये कर्ज दिलेले आहे. सभापती महोदय, एनओसी न घेता हे कर्ज देण्यात आलेले आहे. कुठल्याही प्रकारचा चार्ज न घेता, कोणत्याही प्रकारची सिक्यूरीटी न घेता या बँकेने पैसे दिलेले आहेत. एनओसी न देता कर्ज कसे काय मिळते हे माझ्या सारख्याला तरी अजून न समजलेले कोडे आहे. श्री. कुंटूरकर यांनी सुध्दा या बँकेचे कर्ज घेतलेले आहे. तसेच केंद्रीय मंत्री श्रीमती सुर्यकांता पाटील यांच्या हुतात्मा साखर कारखान्याला 22 कोटी रुपयांचे कर्ज दिलेले आहे. सभापती महोदय, ज्या साखर कारखान्यांना कर्ज दिलेले आहे ते सर्व साखर कारखाने बंद पडलेले आहेत. सहकार आयुक्तांनी 1.5 कोटी रुपये प्रती वर्ष या दराने हे कारखाने लिजवर काढलेले आहेत. साखर सम्राटांनीच बँकेस लुटले असे नसून ज्याला जमेल त्याने हात मारलेला आहे. सभापती महोदय, गफा्र खान यांना नॉन ॲग्रीकल्चर फायनांन्स देण्यात आलेला आहे. ज्या सोसायटया रजिस्टर्ड नाहीत अशा सोसायटयांना देखील कर्ज देऊन मोठया प्रमाणात देऊन या बँकेने भ्रष्टाचार चालविला आहे

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी........

अशी किती नावे घ्यायची ? सर्वधर्म समभाव अशा पध्दतीने भ्रष्टाचार करण्यात आलेला आहे. दैनिक लोकसत्ता, लोकमत, प्रजावाणी या वर्तमानपत्रात या बँकेच्या भ्रष्टाचाराची मालिकाच प्रसिध्द झाली होती. या बँकेच्या डिपॉझीटर्सनी देख्ील त्यांचे पैसे मिळण्याकरिता मोर्चे काढले होते. तरी देखील सरकार काहीही बोलण्यास तयार नाही. माननीय मुख्यमंत्री फक्त घोषणा करतात, माननीय सहकामंत्री घोषणा करतात, पण या घोषणा हवेत उडून गेल्या आहेत. सरकारी कारभाराबाबत इतका पोरकटपणा मी कधीही पाहिलेला नाही. या बाबतीत सरकारने कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही. आज मराठवाड्यातील 8 बँकापैकी 7 बँका बंद आहेत. हा सर्व प्रकार एका दिवसात झ ालेला नाही. 31 मार्च 2004 पर्यंत बॅकेच्या 188 शाखा सुरु होत्या व कर्मचाऱ्यांची संख्या 932 होती. बँक सतत तोट्यात गेल्यामुळे व्यवहार कमी झाला व मार्च 2006 मध्ये 73 शाखा बंद करण्यात आल्या. उर्वरित 115 शाखांपैकी 31 शाखा बंद आहेत. अनेक कर्मचाऱ्यांना कमी करण्यात आलेले आहे. शिपायांना देखील कामावरुन कमी करण्यात आलेले आहे. आता त्या बँकेचे कामकाज पूर्णपणे ठप्प झालेले आहे. कर्मचाऱ्यांना पगार न दिल्यामुळे ते इतरत्र निघून गेले आहेत.

सभापती महोदय, दुसरे एक भ्रष्टाचाराचे उदाहरण म्हणजे विम्या संबंधीचे आहे. सभासदांची परवानगी न घेता संचालक मंडळाने सुमारे 4 कोटी रुपये विम्यामध्ये गुंतवले आहेत. त्यासाठी त्याची लेखी किंवा तोंडी परवानगी सुध्दा घेण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, बँकेने बोगस कर्जाचे देखील वाटप केलेले आहे. बँकने जमीन नसताना, जमीन क्षेत्र कमी असताना, पीक क्षेत्र नसताना,थकबाकीदार असताना लोकांना कर्ज पुरवठा केलेला आहे. श्री.संभाजी इरभाजी ज्याच्याकडे जमीन नाही, त्याला 66 हजार रुपयांचे कर्ज देण्यात आलेले आहे. श्री.सुदाम पैलवाड याच्याकडेही जमीन नाही, त्याने 21 एकर ऊस आहे असे दर्शवून 46 हजार रुपयांचे कर्ज उचलले. याबाबत बँकेने कोणतीही खातरजमा न करता कर्जाचे वाटप केलेले आहे. अशी बरीच अनियमितता या बँकेत झालेली आहे. भ्रष्टाचार करताना कोणतेही ताळतंत्र ठेवलेले नाही. शिक्षक पतसंस्थांनाही रंगीत टी.व्ही पुरविण्यासाठी सुमारे दीड कोटी रुपये कर्जाचे वाटप करण्यात आलेले आहे. हे कर्ज वाटप करताना कोणत्याही प्रकारचे तारण घेण्यात आलेले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी........

नाही. जर व्यवस्थित धोरण स्वीकारण्यात आले असते तर आज शिक्षकांच्या पगारातून ही वसुली झाली असती.

सभापती महोदय, सन 1992 ते 2001 या काळात 553 रोजंदारी कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली. ही भरती करताना सहकार आयुक्तांची परवानगी घेण्यात आलेली नाही. यामध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे.

सभापती महोदय, संगणक खरेदीमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. कोणतेही टेंडर न मागविता कोट्यावधी रुपयांचे संगणक खरेदी करण्यात आले. टेंडर प्रक्रिया मराठवाड्यात नाही असे दिसते. सर्व काही स्वत:च्या मर्जीप्रमाणे करायचे असे संचालकांचे वागणे आहे. हा सर्व भ्रष्टाचार लोकप्रतिनिधी आणि वर्तमानपत्रांनी उघडकीस आणला तरीसुध्दा त्याबाबत शासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही. सभापती महोदय, कलम 88 ची प्रक्रिया ही एक क्वासी ज्युडीशिअरी प्रोसेस आहे. सहकार विभागाला देखील भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी वेगवेगळ्या स्तरावर वेगवेगळे अधिकार दिलेले आहेत. तेव्हा भ्रष्टाचार होऊ नये म्हणून कशाप्रकारे अंकुश ठेवता येईल हे त्या विभागाने पाहिले पाहिजे. परंतु मला समजत नाही की, डॉ.पंतगराव कदम यांनी सहकार खाते बंद करायचे ठरविले आहे काय ?

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

सभापती महोदय, आज शेतक-यांना कर्ज मिळत नाही. याठिकाणी को-ऑपरेटीव्ह बॅका कोलॅप्स झालेल्या आहेत. याठिकाणी सर्वच व्यवस्था बंद झालेली आहे. एक रुपयांचे कर्जही त्याठिकाणी मिळत नाही. याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी तीन घोषणा केल्या होत्या. पहिल्यांदा त्यांनी सांगितले की, एम.एस.सी. बँक 200 कोटी रुपये देईल. परंतु याबाबतीत एम.एस.सी. बँकेने पैसे देण्यास नकार दिला. पैसे परत येणार नाही, यादृष्टीने या बँकेने पैसे देण्यास नकार दिला. आम्ही पैसे देणार नाहीत, असे त्या बँकेने सांगून माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली. त्यानंतर खरिपाच्या बैठकीमध्ये सर्व शेतकऱ्यांना ताबडतोब 7 जूनपूर्वी कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने 200 कोटी रुपये नाबार्डकडून उपलब्ध करुन दिले जातील, असे सांगितले. परंतु आज 19 जुलै उजाडूनही आजपर्यंत पैसा मिळालेला नाही. यामध्ये 12 को-ऑपरेटीव्ह बँका असून त्यांचे पी.एल.आर.चे पैसे डी.सी.सी. बँकांकडे आहेत. आज त्या बँका बंद पडलेल्या आहेत. याची व्यवस्था सेफ डिपॉझिटमध्ये आहे. त्यामुळे माझ्या दृष्टीकोनातून माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेली घोषणा ताबडतोब आजच्या आज, येत्या 1-2 दिवसांमध्ये किंवा अधिवेशन संपण्यापूर्वी माननीय मुख्यमंत्री, माननीय वित्त मंत्री, माननीय सहकार मंत्री आणि मराठवाडयातील महत्वाचे लोकप्रतिनिधी की ज्यांना सहकाराची जाण आहे अशा सर्वांनी एकत्रित घेऊन यातून मार्ग काढण्याच्या दृष्टीने त्वरित एक बैठक घेतली जाणार का ? तसेच, हे 200 कोटी रुपये महाराष्ट्र सरकार स्वत:च्या ट्रेझरीमधून उपलब्ध करुन देणार का ? व या बँका किंवा नवीन बँका चालू करण्याच्या दृष्टीने ताबडतोब कार्यवाही करणार का ? तसेच, ॲसेट लिक्वीडेट करुन किंवा दुसरा अन्य कुठला मार्ग शोधून त्यामार्फत आपण दुसरी बँक चालू करुन त्या बँकाकडून हा 300 कोटी रुपयांचा पैसा मिळवण्यासाठी प्रयत्न करणार का ?

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत निर्माण झालेल्या अडचणीबाबत सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी अतिशय विस्ताराने माहिती दिली. मी शेजारच्याच जिल्हयातील असल्यामुळे याबाबतची माहिती मला आहे. सरकारने याबाबत गांर्भीयाने दखल घेतलेली आहे. याबाबतीत कलम 88 प्रमाणे कार्यवाही चालू आहे. परंतु याबाबतीत डिसेंबर 2005 मध्ये काही मंडळी न्यायालयामध्ये गेलेली आहे. याबबातीत शासनाने फौजदारी खटला दाखल करण्याचे अधिकार प्राधिकारी अधिकाऱ्यास दिले होते. परंतु डिसेंबरमध्ये काही मंडळी न्यायालयामध्ये गेल्यामुळे न्यायालयाने फौजदारी खटला दाखल करण्यापूर्वी स्थगिती दिलेली आहे. आज न्यायालयामध्ये ही केस चालू आहे. तरीसुध्दा कलम 88 प्रमाणे कार्यवाही करुन ज्या स्टेप्स घ्यावयाच्या आहेत त्या आपण घेतलेल्या आहेत. यामध्ये कोणाचीही गय केली जाणार नाही किंवा कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. यातील अनेक गोष्टींच्या तपशिलात जाण्यापेक्षा, जे भागिदारी साखर कारखाने आहेत, ज्या सूत गिरण्या आहेत त्यांची जवळपास दीडशे कोटी रुपयांची थकबाकी आहे, शेतकऱ्यांच्या पत पुरवठयाचीही 300 कोटी रुपयांची थकबाकी आहे. बँकांची परिस्थिती गंभीर आहे, हे मी मान्य करतो. स्वामीनाथन समितीनेही ही बँक फारच अडचणीमध्ये आहे, असे म्हटले. त्याप्रमाणे 200 कोटी रुपये राज्य सरकार सहकारी बँकेने नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेला द्यावेत, असे आदेश देण्यात आले होते.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर.........

100 कोटी रुपयांची गॅरेंटीही घेतली होती. राज्य बँकेचे पूर्वीचे 167 कोटी रुपये येणे शिल्लक होते. त्या रकमेच्या वसूलीबाबत राज्य बँकेला शंका असल्यामुळे राज्य बँकेने सरकारला असे कळविले की, राज्य सरकार जरी हमी देत असली तरी देखील पूर्वीच्या व्यवहारावरुन रक्कम वसूल होईल, असे आम्हाला वाटत नाही. तथापि, शेती कर्ज पुरवठा थांबू नये म्हणून तेथील प्रशासकांनी नाबार्डने 140 कोटी रुपयांचा वित्त पुरवठा करावा, अशा प्रकारचा प्रस्ताव पाठविलेला आहे. नाबार्डकडून अद्याप खुलासा प्राप्त झालेला नाही. नांदेड जिल्हयातील शेतक-यांना वा-यावर सोडू नये म्हणून सन्माननीय सदस्य, श्री.श्रीकांत जोशी यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर बँकेचे अधिकारी, सहकार मंत्री, वित्त मंत्री, राज्य बँक, नांदेड व मराठवाडयातील काही लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक 15 दिवसाच्या आंत आयोजित करण्यात येईल व नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक रिव्हाईव्ह होण्यासाठी किंवा दुस-या एखाद्या पध्दतीने शेती कर्ज पुरवठा होण्याचा दृष्टीने विचार करण्यात येईल. तसेच, जर नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक टेकओव्हर करण्यासाठी जर कुणाचा प्रस्ताव आला तर त्याबाबतही विचार करण्यात येईल.

श्री.सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, नांदेड जिल्हयात शेतक-यांना पतपुरवठा करण्याबाबत मंत्रीमहोदयांनी जो खुलासा केला आहे त्याबाबत मला एवढेच म्हणावयाचे आहे की, लवकरात लवकर याबाबत सरकारने कार्यवाही करावी.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, निश्चित प्रयत्न करण्यात येईल.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतक-यांना कर्ज पुरवठा करण्याच्या बाबतीतील एक महत्वाचा दुवा आहे. 2 वर्षांपासून नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बंद आहे. या दोन वर्षात शेतक-यांना पीक कर्ज पुरवठा बंद होता का ? आणि बँक बंद असेल तर तेथील शेतक-यांना सावकाराकडे जाण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. म्हणून माझी नम्रपणे विनंती आहे की, बैठकीचा घोळ न घालता वित्तमंत्र्यांशी चर्चा करुन शेतक-यांना ताबडतोब पतपुरवठा कसा होईल, हे मंत्रीमहोदयांनी पहावे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, पतपुरवठयासंबंधी ज्या ज्या अडचणी आहेत त्या सोडविण्यासाठीच बैठक आयोजित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य,

..2........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर..........

श्री.सुरेशदादा देशमुख यांच्या एक बाब मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सन्माननीय सदस्य हे परभणी जिल्हयातील आहेत व परभणी जिल्हा नांदेड जिल्हयाला लागून आहे. जालना, परभणी व नांदेड या बँका अडचणीत येण्याची शक्यता आहे, त्यामुळे त्यांनी दक्ष असावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नांदेड जिल्हा बँकेने 150 कोटी रुपये साखर कारखान्यांना दिलेले आहेत. या बँकेप्रमाणेच इतर बँकांनी साखर कारखान्यांना किती कर्ज दिलेले आहे ? तसेच, एमएससी बँकेनेही 160 कोटी रुपये दिलेले आहेत. त्यामुळे कर्जाची आकडेवारी फार मोठी आहे. केवळ बैठक घेऊन यामधून मार्ग निघू शकणार नाही. सन्माननीय राज्यमंत्री महोदय सहकार क्षेत्रातील आहेत. ही बँक लिक्विडेशनमध्ये काढून पतपुरवठा करणारी नवीन संस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर चर्चा करुन याबाबत निर्णय घेण्यात येईल.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, हायकोर्टाचा स्टे घेतला त्याबाबतची कागदपत्रे सहकार खात्याच्या अधिका-यांनी श्री.टाकळीकर यांच्यापर्यन्त पोहोचवली परंतु ती बँकाला प्राप्त झाली नाही. त्यामुळे सहकार खाते आणि बँकेचा कारभार योग्य पध्दतीने होण्यासाठी एक वेगळी बैठक आयोजित करण्यात येईल काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, न्यायालयाची स्थगिती फक्त फौजदारी खटला दाखल करण्यापुरती आहे. नियम 88 च्या कार्यवाहीला स्थगिती नाही. त्यामुळे नियम 88 खाली कार्यवाही सुरु आहे. नियम 88 खालील चौकशीत जे काही पुढे येईल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी)** : अर्धा तास चर्चा संपली आहे.

--------------------

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभाध्यक्ष** : मी आता सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1 वाजून 15 मिनिटांनी पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.00 वाजता 1 वाजून 15 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

---------

यानंतर श्री.सुंबरे ..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. बोरले नंतर --- 13:15

( सभागृह स्थगितीनंतर ... )

**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

**नियम 289 खाली दिलेल्या प्रस्तावांबाबत ...**

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर तातडीने चर्चा करावी यासाठी आज माझ्यासमोर नियम 289 खाली दोन प्रस्ताव आलेले आहेत. त्यापैकी एक प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी, श्री.भास्कर जाधव व इतर यांनी दिलेला आहे आणि दुसरा प्रस्ताव माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.दिवाकर रावते आणि इतर यांनी दिलेला आहे. यापैकी सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी आणि इतर यांनी दिलेला प्रस्ताव हा माझ्याकडे अगोदर आलेला आहे आणि विरोधी पक्षनेत्यांचा प्रस्ताव नंतर आलेला आहे. ...

डॉ. दीपक सावंत : सभागृहाच्या प्रथा आणि परंपरांनुसार विरोधी पक्षाला प्रथम संधी दिली गेली पाहिजे. ...

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, नियम 289 खाली येणाऱ्या प्रस्तावाच्या बाबतीत अशी कोणतीही प्रथा वा परंपरा नाही ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझी आपल्याला एवढीच विनंती आहे की, या सदनातील कोणीही सदस्य नियम 289 खाली प्रस्ताव देऊ शकतात. पण आजपर्यंतच्या सभागृहाच्या इतिहासामध्ये सत्तारूढ पक्षाच्या सदस्यांकडून यापूर्वी कधीही या नियमाचा वापर केला गेलेला नाही. त्यांचे राज्य असतानादेखील हा प्रस्ताव सत्तारूढ पक्ष सदस्यांना मांडावयाचा असेल तर जरूर ते तसा मांडू शकतात. पण अशा प्रकारे दोन वेगवेगळे प्रस्ताव आपल्याकडे आले असताना अगोदर विरोधी पक्षनेत्यांना, विरोधी पक्षाला, बोलण्याची संधी दिली जाते, त्यांचे म्हणणे प्रथम ऐकून घेतले जाते असा संकेत आहे, परंपरा आहे. अर्थात या बाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार हा माननीय सभापती म्हणून आपलाच आहे. मात्र विरोधी पक्षाकडून आणि सत्तारूढ पक्षाकडून अशा प्रकारे कोणताही प्रस्ताव आला तर त्यामध्ये विरोधी पक्षनेत्याला प्रथम मान दिला जातो हे लक्षात घेऊन आपण माननीय विरोधी पक्षनेत्यांना यासाठी संधी द्यावी.

....... एफएफ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी सांगितले त्यानुसार दोन्ही प्रस्ताव एकाच वेळी आले तर निश्चितपणे त्यांनी सांगितल्याप्रमाणे विचार करता येऊ शकेल, तो अधिकार आपला आहे. पण सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी सर्वात अगोदर आपल्याकडे हा प्रस्ताव दिलेला आहे त्यामुळे अगोदर कोणाला संधी द्यावी हा प्रश्नच उद्‌भवत नाही. सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनाच आपण प्रथम संधी दिली पाहिजे. त्यासाठी विचार करण्याचीही गरज नाही असे मला वाटते.

**सभापती** : मी आपल्याला सांगू इच्छितो की, नियम 289 खाली येणारा प्रस्ताव हा सरकारच्या विरोधात आहे असे नाही किंवा निंदाव्यंजक आहे असेही नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी म्हटले तशी परिस्थिती नाही. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना त्या त्या परिस्थितीमध्ये नियम 289 खाली प्रस्ताव देण्याचा, मांडण्याचा हक्क आहे आणि सभागृहातील कोणीही, कोणत्याही बाजूचे सदस्य नियम 289 खाली प्रस्ताव देऊ शकतात, मांडू शकतात. आता एकाच दिवशी दोन प्रस्ताव आज माझ्याकडे आले आहेत आणि अशा प्रकारे एकाच दिवशी दोन प्रस्ताव दोन्ही बाजूकडून येण्याचा प्रसंग विरळाच असतो. अशी परिस्थिती सातत्याने येते असे नाही, अपवाद म्हणूनच असा प्रस्ताव दोन्ही बाजूंकडून येतात. त्यापैकी सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी दिलेला प्रस्ताव हा माझ्याकडे प्रथम आलेला आहे आणि त्यानंतर माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर आणि इतरांचा प्रस्ताव आलेला आहे ही वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत सभापती म्हणून निर्णय देताना माननीय विरोधी पक्षनेत्यांचा मान राखणे हे माझे व आपणा सर्वांचेच कर्तव्य आहे. पण सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांचा प्रस्ताव अगोदर आला असेल., एकाच दिवशी दोन प्रस्ताव आले असतील तर त्यापैकी एक 'अ' असतो आणि दुसरा 'ब' असतो. त्यांचा क्रम त्यानुसारच ठेवला जातो. तेव्हा या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांचा प्रस्ताव अगोदर आलेला असल्याने मी प्रथम त्यांना परवानगी देतो.

( यानंतर श्री. सरफरे ..... जीजी 1 ...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, अपवादात्मक परिस्थितीमध्ये नियम 289 अन्वये मी हा प्रस्ताव सभागृहासमोर मांडतो, आणि आपणास विनंती करतो की, आज आपण हा प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेऊन या विषयावर चर्चा करण्यासाठी परवानगी द्यावी.

" आज दिनांक 19.7.2006 रोजी विधानपरिषद नियम 289 अन्वये प्रश्नोत्तरांचा तास स्थगित करुन खालील विषयावर चर्चा करण्यात यावी.

ज्या अर्थी, दिनांक 11.7.2006 रोजी मुंबईतील पश्चिम रेल्वेच्या लोकल डब्यात काही मिनिटांच्या अंतराने अतिरेक्यांनी एका पाठोपाठ एक असे बॉम्बस्फोट केले. त्यात 200 पेक्षा अधिक निष्पाप व्यक्ती मृत्युमुखी पडल्या, आणि एक हजारपेक्षा जास्त व्यक्ती जबर जखमी,

ज्या अर्थी, या राष्ट्रीय संकटाचे राजकीय भांडवल करुन मुंबई शहरात शांतता, जातीय सलोखा निर्माण करण्याऐवजी काही जातीय व धर्मांध शक्ती या शहरात व राज्यात जाणुनबुजून अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असून. त्यांच्या या कारस्थानात राज्याबाहेरील काही नेते प्रक्षोभक भाषणे करुन वातावरण बिघडविण्याचा हेतूपुरस्सर प्रयत्न करीत आहेत.

आणि ज्याअर्थी, आता मुंबईचे वातावरण पूर्व पदावर येत असतांना नागरिकांना दिलासा देण्याऐवजी त्यांच्या भावना भडकविण्याचा व राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण करुन राजकीय लाभ उठविण्याचा काही राजकीय पुढारी प्रयत्न करीत असून,

त्या अर्थी, राज्यात शांतता निर्माण होत असतांना ती बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाय योजना व शासनाची प्रतिक्रिया".

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या प्रस्तावाला आपण परवानगी कशी देता हे मला कळत नाही? या सभागृहामध्ये जी चर्चा होते असते, ज्यामध्ये राज्य सरकारची जबाबदारी असते, त्या संदर्भात प्रस्ताव देण्यात येत असतो. इतर राज्यातील मंडळींनी या राज्यात येऊन काही केले तर या सरकारला त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार आहे. सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत, गृहमंत्री उपस्थित आहेत. तेव्हा जर त्यांना काही आक्षेपार्ह वर्तन केल्याचे वाटत असेल तर महाराष्ट्राच्या गृह विभागाच्या प्रचलित कायद्याप्रमाणे त्यांच्यावर आपल्याला कारवाई करता येईल. ती कारवाई करण्याचा अबाधित अधिकार सरकारला आहे. तशाप्रकारे बाहेरच्या राज्याच्या जबाबदार नेत्यांच्या नावाचा उल्लेख नसतांना, त्यांच्यावर शासनाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नसतांना, त्यांनी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

कोणत्याही प्रकारचा गुन्हा केल्याची नोंद पोलीस स्टेशनमध्ये दर्ज केली नसतांना, या सभागृहामध्ये इतर राज्याची बदनामी होईल अशाप्रकारे संदिग्ध बोलणे किंवा त्यासंबंधी वक्तव्य करणे यामुळे इतर राज्यातील प्रमुखांचा अपमान केल्यासारखे होईल. आणि अशाप्रकारे दोन राज्यांमध्ये मतभेद निर्माण केल्यासारखे होईल...

(सत्ताधारी बाजूकडील माननीय सदस्य उभे राहून बोलू लागतात.)

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय,...

**सभापती** : माननीय सदस्य श्री. विनायक मेटे आपण खाली बसावे. माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी आपण नियम 289 अन्वये प्रस्ताव कसा होतो एवढया मर्यादेतच बोलावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा अजून पूर्ण झालेला नाही. या सभागृहाचे सार्वभौम सभापती आपण आहात. आपल्याकडे जेव्हा लिखित स्वरुपामध्ये प्रस्ताव दिला गेला तेव्हा आपण कदाचित तो वाचला असेल. त्यामध्ये राज्य घटनेने निवडून दिलेल्या इतर राज्यातील कोठल्याही जबाबदार व्यक्तीच्या विरुध्द, प्रधान मंत्र्यांविरुध्द, किंवा राज्यसभा-लोकसभेच्या सदस्यांविरुध्द किंवा एखाद्या राज्यातील लोकांनी निवडून दिलेल्या विधानसभेतील नेता झालेल्या मुख्यमंत्र्यांविरुध्द निंदानालस्ती करण्याचा अधिकार व त्यासंबंधी या सभागृहामध्ये चर्चा करण्याचा प्रस्ताव देणे योग्य आहे काय? ही लॅग्वेज बरोबर आहे काय? हे आपण चालू देत आहात ते नियमाला धरुन आहे कां? माननीय सदस्यांनी हा प्रस्ताव दिला आहे, त्यांनी याबाबत बाहेर काहीही बोलावे. परंतु त्यांनी या सभागृहामध्ये जे आक्षेपार्ह विधान केले आहे ते बरोबर आहे काय? यासंबंधी माझा आक्षेप आहे. म्हणून माझी विनंती आहे की, आपण त्यांचे ते वाक्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावे.

(गोंधळ)

**सभापती** : आपण कृपया सर्व जण खाली बसावे. मी माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्दयासंबंधी उत्तर देतो.

(गोंधळ)

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुध्दीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

SKK/ KGS/ SBT/ MHM/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे... 13:25

....अडथळा..

श्री.नितीन गडकरी : हिंमत असेल तर श्री.नरेंद्र मोंदींवर कारवाई करा.

...अडथळा...

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आणि सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलत असतात.)

..(अडथळा)...

श्री.नितीन गडकरी : हे काँग्रेस पक्षाचे किंवा राष्ट्रवादी पक्षाचे कार्यालय नाही.

**सभापती** : नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर कोणाही अन्य व्यक्तीचे नाव नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मांडलेला हरकतीचा मुद्दा मी नाकारत आहे.

...(अडथळा)

श्री.नितीन गडकरी : तुमच्या सरकारमध्ये दम असेल तर मोदींवर कारवाई करा.

श्री.विनोद तावडे : माझा पॉईन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे.

...(अडथळा)...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी आपण 289 चा प्रस्ताव कसा होतो एवढेच सांगा.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मुबई शहरातील पश्चिम उपनगरीय रेल्वेमध्ये...

श्री.नितीन गडकरी : अन्य राज्यातील व्यक्तींचे नाव घेण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे ? सभापती महोदय, या विषयावर चर्चा होऊ द्या. त्यांच्या चर्चेच्या मागणीला आमचा सपोर्ट आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मुंबईतील पश्चिम उपनगरीय रेल्वेमध्ये सात बॉम्बस्फोट झाले.

श्री.नितीन गडकरी : तुम्ही नाव घेऊन आरोप करा.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : तेही मी करतो. घाई कशाला करता ?

**सभापती** : हा प्रस्ताव कसा होतो, तेवढेच सन्माननीय सदस्यांनी सांगावे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, 11 जुलैला मुंबईतील पश्चिम रेल्वेमध्ये अतिरेक्यांनी सात बॉम्बस्फोट एकेका मिनिटांच्या अंतरावर घडवून आणले. हे बॉम्बस्फोट झाल्यानंतर दूरचित्र वाहिन्यांनी त्या ठिकाणचे चित्रण करुन, मृहदेह कसे काढले जात होते, त्याचे

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (पुढे सुरु....

दृश्य दाखविले. त्या ठिकाणी हिंदू कार्यकर्ते असतील, मुस्लीम कार्यकर्ते असतील सगळे मिळून मृतदेह बाहेर काढत होते...

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे जो प्रस्ताव मांडत आहेत, त्या प्रस्तावाला पाठिंबा द्यावा,असे आम्हाला वाटत होते. परंतु त्यांचा प्रस्ताव व्हेग आहे. त्यांनी लिखित प्रस्तावामध्ये नाव घेतलेले नाही, त्यामुळे तो व्हेग प्रस्ताव आहे.

...(अडथळा)...

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलतात.)

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, 11 तारखेला जो बॉम्बस्फोट झाला त्या बॉम्बस्फोटामध्ये 200 माणसे मृत्युमुखी पडली आणि हजारपेक्षा जास्त लोक जखमी झाले.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

त्यांना निरनिराळ्या हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. सभापती महोदय, आपल्या देशाचे माननीय राष्ट्रपती काल मुंबईमध्ये आले आणि काल सायंकाळी 6 वाजून 25 मिनिटे ते 6 वाजून 27 मिनिटे या कालावधीमध्ये ते या मुंबई शहरामध्ये शांततेसाठी आवाहन करीत असताना....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, बॉम्बस्फोटामध्ये मृत्युमुखी पडलेल्या लोकांना मुंबईकरांच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी काल माननीय राष्ट्रपती मुंबई शहरामध्ये आले होते. त्यापूर्वी आपल्या देशाचे माननीय पंतप्रधान मुंबईमध्ये आले होते. या देशाचे विरोधी पक्ष नेते सुध्दा मुंबईमध्ये आले होते. मुंबई शहरामध्ये बॉम्बस्फोटामुळे काय परिस्थिती निर्माण झाली हे त्यांनी पाहिले. आमची अशी अपेक्षा होती की, हा कोणत्याही धर्माचा प्रश्न नाही, हा राजकारणाचा प्रश्न नाही, हा या देशावरील आघात आहे, अतिरेक्यांनी केलेला हा आघात आहे असे आपण मानले पाहिजे. जी अतिरेकी संघटना होती त्यांनी जाहीर केले की, आम्ही हा घातपात घडवून आणलेला आहे. हा हिदूंनी, मुसलमानांनी किंवा कोणत्याही कार्यकर्त्यांनी घडवून आणलेला घातपात नाही. हा घातपात अतिरेक्यांनी घडवून आणलेला आहे. हे हिंदूवरील किंवा केवळ आपल्या राज्यावरील संकट नाही तर हे देशावरील संकट आहे. या पार्श्वभूमीवर या ठिकाणी श्रध्दांजली वाहण्याच्या कार्यक्रमाच्या नावाखाली गुजरातचे मुख्यमंत्री या ठिकाणी येतात.....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या ठिकाणी ...

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी कोणाचेही नाव घेतलेले नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, आपण बाहेरच्या लोकांची नावे घेऊ नका. जर आपण बाहेरच्या लोकांची नावे घेतली तर ती कामकाजातून काढावी लागतील.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या ठिकाणी त्यांनी प्रक्षोभक भाषण केले. "ईंट का जबाब पत्थर से देंगे" अशा पध्दतीचे उद्गार काढले. एक वर्षापूर्वी....

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ MHM/ SBT/ KGS

( विरोधी पक्षाचे सन्मानीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, आपण आपला मुद्दा मांडत असताना कोणाचेही नाव घेऊ नका.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी कोणाचेही नाव घेतलेले नाही. सभापती महोदय, या ठिकाणी "ईंट का जबाब पत्थर से देंगे" असे त्यांनी सांगितले. राज्यातील एका पक्षाचे प्रमुख नेते सांगतात की, आम्ही महाराष्ट्राचा गुजरात करुन टाकू. म्हणजे तुम्ही लोकांचा बळी घेणार काय ? या ठिकाणी रक्ताचे पाट वाहणार काय ? सभापती महोदय, आपण आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन नियम 289 अंतर्गत या विषयावर चर्चा मान्य करावी अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, त्यांना नाव घेऊ द्यावे आणि आम्हालाही नाव घेऊ द्यावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे.

**सभापती** : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्या विषयाचा आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत समावेश नसल्यामुळे नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव मी नाकारत आहे. यानंतर सन्मानीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात आपले म्हणणे मांडावे.

( सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय मुख्यमंत्र्यांच्या आसनाजवळील मोकळ्या जागेत एकत्र जमून घोषणा देतात )

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

यानंतर श्री. शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य व्यासपीठाजवळील मोकळया मार्गिकेमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात. विरोधी पक्षाचेही काही सन्माननीय सदस्य जोरजोराने घोषणा देत असतात.)

**सभापती** : मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक 1.35 वाजता 15 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

---

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

(सभागृहामध्ये सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य फलक हाती धरुन घोषणा देत असतात)

**सभापती** : सभागृहामध्ये अशा पध्दतीने फलक आणणे, फलक दाखविणे हे शिस्तीमध्ये बसत नाही.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य मोकळया मार्गिकेमध्ये येऊन घोषणा देत असतात)

**सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी आपण गटनेते आहात, जबाबदार नेते आहात. अशा पध्दतीने सभागृहामध्ये वर्तन करणे योग्य नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी नियम 289 अन्वये तहकुबीची सूचना दिलेली आहे. त्यासंबंधी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

(सभागृहामध्ये सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य फलक हाती धरुन घोषणा देत असतात)

..2..

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, दिनांक 7 जुलै, 2006 रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने केलेले 1495 शाळांचे शाळा वाटप रद्द करुन एक धक्कादायक निर्णय दिला होता. काल, दिनांक 18 जुलै, 2006 रोजी खंडपीठाने राज्यातील दुसऱ्या टप्प्याच्या 646 नवीन शाळांच्या वाटपाला स्थगिती देऊन राज्य सरकार आणि शिक्षण मंत्री महोदयांना आणखी एक धक्का दिलेला आहे.

(सभागृहामध्ये सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य फलक हाती धरुन घोषणा देत असतात)

न्या.दिलीप सिन्हा आणि न्या.आर.सी.चव्हाण यांच्या खंडपीठाने अमरावतीच्या राज्य शिक्षण महामंडळाच्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना शालेय शिक्षणमंत्री श्री.वसंत पुरके यांना नोटीस बजावली असून येत्या दोन दिवसात उत्तर मागितले आहे. शाळांच्या वाटपास स्थगिती देताना मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करुन शाळांना मान्यता देण्यात आल्याची टिपणी सुध्दा न्यायालयाने केली आहे.

(सभागृहामध्ये सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य फलक हाती धरुन घोषणा देत असतात)

शाळा मंजूर करताना न्यायालयाने मार्गदर्शक तत्वे सुचविली होती. त्यानुसार शासनाने मास्टर प्लॅन तयार करावा, त्यात विद्यमान शाळा, त्याची क्षमता, शाळा कुठे हवी, त्यात कुठली तुकडी हवी, त्याचे माध्यम इत्यादी तपशील देऊन त्याची जाहिरात प्रसिध्द करावी. नवीन शाळेमुळे विद्यमान शाळांवर विपरित परिणाम होणार नाही तसेच शाळांमध्ये जीवघेणी स्पर्धा होणार नाही याची दखल घ्यावी. तथापि न्यायालयाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वाची पायमल्ली झाल्यामुळे नवीन शाळांना दिलेली परवानगी रद्द करावी अशा प्रकारची मागणी याचिकेतून करण्यात आली.

(सभागृहामध्ये सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य फलक हाती धरुन घोषणा देत असतात)

श्री.पुरके यांनी दिनांक 30 मे व 15 जून, 2006 रोजी 646 नवीन शाळांच्या वाटपाला मंजुरी दिली होती. नवीन शाळांना परवानगी देताना राजकीय नेत्यांच्या शाळांना प्राधान्य देण्यात आले. त्यात शिक्षणमंत्र्यांच्या वडिलांच्या नावाने असलेल्या यवतमाळच्या चिंधुजी पुरके शिक्षण प्रसारक मंडळाच्या 9 शाळांना मंजुरी देण्यात आली आहे. 646 नवीन शाळांना मान्यता देतानाही त्याच प्रकारची पुनरावृत्ती झाली आहे ही अतिशय गंभीर बाब आहे. सभापती महोदय, या

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

राज्यामध्ये जवळपास 2000 शाळा अनधिकृतपणे वाटल्या गेल्या. मार्गदर्शक तत्वांचे पालन झाले नाही म्हणून या गंभीर विषयावर या सभागृहात चर्चा होण्याच्या दृष्टीने आजचे सभागृहाचे सर्व कामकाज बाजुला सारुन या महत्वपूर्ण विषयावर चर्चा घेण्यात यावी आणि शिक्षणमंत्री श्री.वसंत पुरके यांच्यावर ताबडतोब कारवाई करुन त्यांना मंत्रिमंडळातून बाजूला करावे अशी या प्रस्तावाच्या निमित्ताने मी मागणी करतो.

(सभागृहामध्ये सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य फलक हाती धरुन घोषणा देत असतात)

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन हाती फलक उंचावून घोषणा देत असतात. )**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या महाराष्ट्रात आजपर्यंत अनेक गोष्टींचा लिलाव हे सरकार करत आलेले आहे. परंतु आता या महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा लिलाव करण्याची नवीन प्रथा या सरकारने आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी सुरु केलेली आहे. दुर्दैव असे आहे की,

**( सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन हाती फलक उंचावून घोषणा देत असतात. )**

ज्यावेळेस माननीय सुरुपसिंग नाईक यांना कोर्टाने सजा फर्मावली त्यावेळेस माननीय मुख्यमंत्री म्हणाले होते की, कॉंग्रेसची संस्कृती आहे की, ज्यावेळेस कोर्ट मंत्र्यावर ताशेरे ओढते त्यावेळेस

**( सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन हाती फलक उंचावून घोषणा देत असतात. )**

संबंधित मंत्री राजीनामे देत असतात.

**सभापती** : अशा गोंधळाच्या वातावरणात सभागृहाचे कामकाज करणे मला शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 2.56 वाजता 15 मिनिटांसाठी स्थगित झाली. )

----------

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

( सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी त्यांचे भाषण पुढे सुरु करावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काही दिवसांपूर्वीच शिक्षणमंत्री प्रा.वसंत पुरके यांनी 1495 शाळांना दिलेली मान्यता मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रद्द करण्याचा दिला निर्णय दिला होता. आता पुन्हा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शिक्षणमंत्री श्री.वसंत पुरके यांनी 646 शाळांना दिलेली मान्यता रद्द केलेली आहे. शिक्षणमंत्र्यांनी जो खेळखंडोबा चालविला आहे तो ताबडतोब बंद केला पाहिजे. अधिकाऱ्यांना हाताशी धरुन शिक्षणक्षेत्राचा जो लिलाव चालविला आहे, तो बंद केला पाहिजे. माननीय उच्च न्यायलयाने जो निर्णय दिलेला आहे त्याची जबाबदारी स्वीकारुन माननीय शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे अशी माझी मागणी आहे. शिक्षणाच्या संदर्भातील शासनाचे धोरण काय आहे हे जनतेपुढे आले पाहिजे. तेव्हा सभागृहापुढील सर्व कामकाज बाजुला ठेवून महाराष्ट्रातील या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणावी अशी माझी आपणाला विनंती आहे.

( सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

**सभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी कृपया आपापल्या जागेवर जाऊन बसावे. तसेच त्यांनी जे फलक आणलेले आहेत ते बाहेर घेऊन जावेत. आपले अशाप्रकारचे वागणे शिस्तीत बसणारे नाही. आता मी सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांना बोलण्याची परवानगी देत आहे. .

( सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, दिनांक 7 जुलै 2006 रोजी मुंबई उच्च न्यालयाच्या नागपूर खंडपीठाने शिक्षणमंत्री प्रा.वसंत पुरके यांनी मान्यता दिलेल्या 1495 शाळांचे वाटप रद्द करण्याबाबत निर्णय दिला. या घटनेला 15 दिवसांचा कालावधी लोटला नसतानाच याच खंडपीठाने शिक्षणमंत्र्यांनी वाटप केलेल्या 646 शाळांचे वाटप रद्द केलेले आहे. माननीय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे........

शिक्षणमंत्र्यांनी निवेदन करताना सांगितले होते की, आम्ही नियमांचे पालन करुनच शाळांचे वाटप केलेले आहे. जर नियमांचे पालन केले असते तर न्यायालयाने त्यास स्थगिती दिली नसती.....

( सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

**सभापती** : अशा परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज 20 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.14 वाजता 20 मिनिटांकरिता स्थगित करण्यात आली. )

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी : माननीय सभापती )**

( सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य घोषणा देतात. )

**सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर जाऊन बसावे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, कृपया आपण आपल्या जागेवर जाऊन बसावे.

(सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये जी सूचना दिली होती त्यासंदर्भात त्यांनी आपले म्हणणे मांडले आहे. आता प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ संपली आहे. सबब त्यांनी मांडलेला प्रस्ताव मी नाकारीत आहे.

सन्माननीय सदस्यांनी आपआपल्या जागेवर जाऊन बसावे, अशी मी पुन्हा विनंती करतो.

(सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दिवसभरासाठी स्थगित करीत आहे. उद्या, गुरुवार, दिनांक 19 जुलै, 2006 रोजी सकाळी 10.00 ते 12.45 वाजेपर्यन्त अशासकीय विधेयके घेण्यात येतील व त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 01.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 36 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 20 जुलै 2006 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

--------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही